शनिवार, 25 जून 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 292
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 25 JUNE 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-292 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



## दिवेघाटातून वळणाच्या वाटेवरील माऊलींना पाहण्यासाठी तुडुंब गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**उंड्री :** माऊली... माऊली... माऊली...चा जयघोष करीत सोन्या-माऊलीबरोबर सर्जा-राजाच्या साथसंगतीने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा रथ दिवेघाटातून डौलात चालला होता. माऊलींची सोहळा पाहण्यासाठी दिवेघाटावर अवघा वैष्णवभक्त अवतरलेला दिसून आला. टाळ-मृदंगाच्या गजरात माऊलींच्या रथावर हलकीशी वरुणराजाची बरसात झाली. दिवेघाटातील देखणा सोहळा मोबाईलच्या किलकिलाटात अनेकांनी टिपला गेला, तर भाविक भक्तांनी लक्ष लक्ष लक्ष नेत्रांमध्ये साठवला. हडपसर गाडीतळ येथील चहा-पानानंतर माऊलींची पालखी वडकीनाला येथील विसाव्याच्या ठिकाणी दुपारी दीडच्या सुमारास आली आणि पावणे तीनच्या सुमारास दिवेघाट मार्गे सासवडकडे मार्गस्थ झाली.
दरम्यान, माऊलींची कृपा झाली आणि वरुणराजाने दहा पंधरा मिनिटे वरुणराजाने हजेरी लावल्यामुळे वैष्णवभक्तांनी समाधान व्यक्त केले. दिवेघाटात पावसाने सुरूवात करताच वैष्णवभक्तांनी इरले अंगावर घेत तर काहींनी पावसात भिजत माऊलींच्या नामाचा जयघोष सुरू केला. वडकीनाला येथील दोन तासांच्या विसाव्यानंतर माऊलींच्या रथाला मानाच्या चार बैलजोड्यांसह परिसरातील शेतकऱ्यांनीही बैलजोड्या जोडल्या होत्या. सर्जा-राजाची जोडी दिमाखात चालताना शेतकऱ्यांबरोबर वैष्णवभक्तही हरखून गेला होता. दिवेघाटाची वाट प्रशासनाने सोपी केल्यामुळे वैष्णवभक्तही समाधानी होता.
दिवे घाटावरील श्री विठ्ठलाच्या भव्यदिव्य मूर्तीचे दर्शन घेत वैष्णवांना सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही. वैष्णवभक्तांचा दिवेघाटातील सोहळा देश-विदेशातून आलेल्या भाविकांनी मोबाईलमध्ये टिपला. कोरोनामुळे मागिल दोन वर्षे पालखी सोहळा झाला नाही, त्यामुळे यावर्षी महाराष्ट्राच्या नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यातून वैष्णवभक्तांचा आषाढीवारीला महापूर लोटला होता. पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकरीराजा नाराज होता. पांडुरंगच काय ते करील, असे म्हणत वैष्णवभक्त माऊली माऊली माऊलीचा नामघोष करीत होता. वरुणराजाने आज हजेरी लावली आहे. गावाकडे पाऊस झाला असला, तर पेरणी करून पुन्हा वारीत सहभागी होणार असल्याचे पारडी (हिंगोली) येथील काशीनाथ सीताराम सांगळे यांनी सांगितले.

# इडीचा सेनेला दे धक्का !

## अर्जुन खोतकरांवर मोठी कारवाई; कारखान्याची २०० एकर जमीन जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाविकास आघाडीच्या ठाकरे सरकारमधील मंत्री आणि शिवसेनेच्या प्रमुख फळीतील नेते एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडखोरीनंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. शिवसेनेसह महाविकास आघाडीसाठी हा एक मोठा भूकंप मानला जात आहे. यानंतर आता शिवसेना आणि शिंदे गट यांतील संघर्ष तीव्र होताना दिसत आहे. यातच शिवसेनेला एकावर एक धक्के बसत आहेत. एकाबाजूला शिंदे गटाचे मोठे बंड, दुसऱ्या बाजूला अनिल परब यांची ईडीकडून सलग चौकशी सुरू असताना, यात भर म्हणून शिवसेना नेते अर्जुन खोतकर यांच्या साखर कारखान्यावर ईडीने मोठी कारवाई केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन खोतकर यांच्या जालन्यातील साखर कारखान्यावर ईडीने कारवाई केली आहे. यामध्ये कारखान्याची २०० एकर जमीन आणि यंत्रसामग्री ईडीने जप्त केली आहे. काही दिवसांपूर्वी याच कारखान्यावर ईडीच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकला होता.
यानंतर आता या कारखान्याच्या जमिनीच्या जप्तीचा निर्णय ईडीकडून घेण्यात आला आहे. यामध्ये कारखान्याची इमारत, संबधित जमीन आणि त्यातील यंत्रसामग्री या सर्वांचा समावेश आहे. या कारखान्याच्या विक्रीचा व्यवहार चुकीच्या पद्धतीने झाल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

**अर्जुन खोतकर संचालक असलेला हा कारखाना**

शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकर हे या कारखान्याच्या संचालक मंडळावर असल्याचे सांगितले जात आहे. या कारखान्याच्या विक्रीचा व्यवहार नातेवाइक आणि इतरांच्या सहकार्याने चुकीच्या



पद्धतीने व्यवहार करण्यात आल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आला आहे.
कारखान्यावर धाड टाकताना याच्या खरेदी सहभागी असलेले औरंगाबादचे एक बिल्डर तसेच मालक यांच्या संबंधित ठिकाणीही ईडीने छापेमारी केली होती, अशी माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणी ही पहिलीच कारवाई असून, अर्जुन खोतकर यांच्यासह या व्यवहारात सहभागी असलेल्या सर्वांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

### ईडीच्या कारवाईनंतर गुवाहाटीला जाणार का?

ईडीच्या कारवाईच्या वृत्तानंतर अर्जुन खोतकर यांची प्रतिक्रिया समोर आली. ईडीने कारखान्यावर नेमकी काय कारवाई केली माहिती नाही. मुंबईहून नाशिकला जात असताना मला ही माहिती मिळाली. अनेकांचे याबाबतीत फोन येत आहेत. तिथे गेल्यावर नेमकी माहिती मिळू शकेल. त्यानंतर मी माझी भूमिका स्पष्ट करेन. काय ती कायदेशीर लढाई लढू, असे खोतकर म्हणाले. यावेळी ईडीच्या कारवाईनंतर आता गुवाहाटीला जाणार का, असा प्रश्न अर्जुन खोतकर यांना विचारण्यात आला, त्यावर बोलताना, काय बोलता तुम्ही. असे काहीच होणार नाही, असे खोतकर म्हणाले.

## सर्वोच्च न्यायालयाकडून पंतप्रधान मोदींना क्लिन चीट

### गुजरात दंगलप्रकरणी जाफरींची याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** २००२ साली झालेल्या गुजरात दंगली प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदींना क्लिन चीट दिली. या अगोदर एसआयटीनेही पंतप्रधान मोंदींसह इतर लोकांना क्लिन चीट दिली होती. याविरोधात काँग्रेसचे माजी खासदार एहसान जाफरी यांच्या पत्नी झाकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळत पंतप्रधान मोदींना क्लिन चीट दिली आहे.
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.एम. खानविलकर यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर गेल्या वर्षी ९ डिसेंबर रोजी सुनावणी घेण्यात आली होती.
दोन्ही पक्षांचं म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर न्यायलयाने निकाल राखून ठेवला होता. त्यानंतर आज एसटीआयच्या अहवालावर शिक्कामोर्तब करत झाकिया जाफरी यांनी दाखल केलेल्या याचिकेत योग्यता नसल्याचे न्यायालयाने म्हणणे आहे.



**काय आहे दंगल प्रकरण?**

२८ फेब्रुवारी २००२ साली गुजरातमधील अहमदाबाद येथे दंगल झाली होती. या दंगलीत एहसान जाफरीसह ६९ जणांची हत्या करण्यात आली होती. त्यावेळेस गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी होते. तपासानंतर एसटीआयने नरेंद्र मोदींसह ६४ जणांना क्लिन चीट दिली होती. एसटीआयच्या या अहवालाविरोधात झाकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल यांनी झाकिया यांची बाजू न्यायलयात मांडली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी, सीटी रविकुमार यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी घेण्यात आली.

## द्रौपदी मुर्मू यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### राष्ट्रपती निवडणूक : पंतप्रधान मोदींसह एनडीए नेत्यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज




**नवी दिल्ली :** राष्ट्रपतीपदाची निवडणूक जवळ आली आहे. येत्या १८ जुलै रोजी मतदान होणार असून २१ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे. एनडीए आणि विरोधी पक्षाकडून राष्ट्रपती पदाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राष्ट्रपती पदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांनी आज संसद भवनात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाचे नेते उपस्थित होते.
द्रौपदी मुर्मू यांनी झारखंडच्या माजी राज्यपाल होत्या. आदिवासी समाजातून आलेल्या त्या पहिल्या महिला नेत्या आहेत ज्या भारताच्या सर्वोच्चपदाची निवडणूक लढवत आहेत. द्रौपदी मुर्मू यांच्या उमेदवारी अर्जातील पहिले प्रस्तावक मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आहेत. द्रौपदी मुर्मू यांच्या नामांकन पत्रावर स्वाक्षरी करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानत ट्विट केले आहे. मुर्मू यांच्या नामनिर्देशन पत्रावर प्रस्तावक आणि समर्थक म्हणून केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निवासस्थानी स्वाक्षरी करण्यात आली आहे. द्रौपदी मुर्मू यांना आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनीही पाठिंबा दर्शवला आहे. मुर्मू यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या पक्षाचे राज्यसभा खासदार विजय साई रेड्डी आणि पक्षाचे लोकसभेतील नेते मिधुन रेड्डी उपस्थित होते.

## राहुल गांधींच्या कार्यालयाची एसएफआय कार्यकर्त्यांनी केली तोडफोड

आधुनिक केसरी न्यूज

**वायनाड :** महाराष्ट्रात सत्तासंघर्ष सुरु असताना देशाच्या राजकारणातून अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. राहुल गांधी यांचे वायनाडमधील कार्यालय फोडल्याची माहिती समोर येत आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरुर यांनी कार्यालयाच्या तोडफोड केल्याचा व्हिडीओ ट्विट केला आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया च्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वायनाड येथील कार्यालयाची तोडफोड केली. कार्यालयातील सामानाचे नुकसान झाले आहे. कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही दुखापत झाल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात येत आहे.
सर्वोच्च न्यायालयाच्या नुकत्याच झालेल्या निर्णयामुळे एसएफआयचे कार्यकर्ते संतप्त झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांना या मुद्द्यावर राहुल गांधींचे मत जाणून घ्यायचे होते, त्यांनी अद्याप यावर प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे हे निदर्शने करण्यात आले आणि एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या कार्यालयाची तोडफोड केली. समोर आलेल्या घटनेच्या व्हिडिओमध्ये काही आंदोलक कार्यालयाच्या खिडकीतून आत जाण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसऱ्या व्हिडिओमध्ये पोलीस आंदोलकाला घटनास्थळावरून उचलून ताब्यात घेताना दिसत आहेत.
काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाबाबत मोठा निर्णय दिला होता. संरक्षित जंगले, वन्यजीव अभयारण्यांभोवतीचा एक किलोमीटरचा संपूर्ण परिसर इको सेन्सिटिव्ह झोन असणार आहे, असे त्या निर्णयात स्पष्ट करण्यात आले होते. ईएसझेडच्या सर्व कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. मात्र, केरळमध्ये हा वाद यावरून आहे की, तिथे या नियमाची काटेकोर अंमलबजावणी झाली, तर इको-सेन्सिटिव्ह भागात राहणाऱ्या लोकांचे काय होईल, ते कुठे जातील? या मुद्द्यावर एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी वायनाडमध्ये निदर्शने केली आणि राहुल गांधींचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या मुद्द्यावर राहुल गांधी आतापर्यंत माध्यमांशी बोलले नसले तरी त्यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

रसिक वाचकहो,
गेल्या काही दिवसांपासून मी तुमच्याशी निसर्ग आणि त्या संबंधात बोलतो आहे. मी मागे एका लेखात म्हटलं होतं की निसर्ग हा माझा वीक पॉईंट आहे. पण त्यापेक्षाही पाऊस हा माझा आणखी जिव्हाळ्याचा विषय. मी निसर्गावर बोलतोय. मग पावसावर बोलल्याशिवाय कसा राहीन बरं ? त्यांचं आणि माझं नातं खूप जुनं. जेव्हा कळायला लागलं तेव्हापासूनच. त्याची सगळी रूपं मी अनुभवलेली. त्याचं कधी रौद्र भयानक रूप, छातीत धडकी भरवणारं. सगळ्यांची दैना करणारं. तर त्याचा उदार रूप. सृष्टीला नवसंजीवनी देणारं रूप. ते तर मला अति प्रिय. श्रीकृष्णांनी गीतेत मला वसंत ऋतू आणि मार्गशीर्ष मास प्रिय असे म्हटले आहे. पण मला वाटतं की तोच सावळा कृष्ण सावळ्या मेघांचं रूप घेऊन पावसाळ्यातही आपल्याला दर्शन देतो. पाऊस देणाऱ्या इंद्रदेवाची पूजा त्यानं बंद करवली. आणि पावसापासून



## जादूगार पाऊस...

गोकुळाचं रक्षण करण्यासाठी त्यानं गोवर्धन आपल्या करंगळीवर उचलला.
मला वाटतं तोच कान्हा युगानुयुगे या पावसाच्या रूपाने सृष्टीचा गोवर्धन पर्वत उचलून नवसंजीवनी देत असावा. हा त्याने उचललेला गोवर्धन असतो, दुःख, दैन्य, दारिद्र्याचा, दुष्काळाचा. त्यापासून आपलं रक्षण करण्यासाठी तो आनंदघन पाऊस येतो. तो गीतेत जे म्हणतो ना, ' संभवामी युगेयुगे..' मला तर वाटतं या पावसाच्या रूपानं खरंच तो युगानुयुगेआपल्यात येत असतो. तो आला की सोबत उज्वल भविष्य घेऊन येतो. जमिनीतून उगवणारे हिरवे कोंब त्याचा सांगावा घेऊन येतात. ते आपल्याला भविष्याविषयी आश्वस्त करतात. अशा वेळी मला आठवते मंगेश पाडगावकरांची एक सुंदर आशयघन रचना. ' श्रावणात घननीळा बरसला..' आज मी तुमच्याशी या गीताबद्दलच बोलतो. कारण पाडगावकरांनी या गीतात आपल्या सगळ्यांच्या मनातले भाव व्यक्त केले आहेत असं मला वाटतं.
ही रचना मी कितीही वेळा ऐकली तरी माझं समाधान होत नाही. या गाण्यात एक सुंदर असात्रिवेणी संगम झालेला आहे. आणि जिथे त्रिवेणी संगम झालेला असतो, त्या ठिकाणचे पावित्र्य, सौंदर्य मी आपल्याला काय सांगावे ? ती फक्त अनुभवण्याची गोष्ट आहे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## कलेमुळे जीवन समृद्ध होतं

आधुनिक केसरी

अगदी अलीकडच्या काळापर्यंत 'कला' ह्या शब्दाला काही एक अर्थ, मान होता. गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला यांना राजघराण्यात, सरकारदरबारी आश्रय होता. मात्र आधुनिकीकरण झाल्यामुळे कालांतरानं परिस्थिती बदलली. अभिजात कलांना कोणी विचारेनासं झालं. अर्थात ह्याची जाणीव सर्वांना झाली असं नाही. एखाद्या कलेची साधना करणं म्हणजे आयुष्य वाया घालवणं, असा नवीन पिढीकडून विचार केला जाऊ लागल्याचं समजतं, त्याचाच खेद वाटतो. त्यातच शिक्षणपद्धती देखील बदलली. गुरु शिष्य परंपरेनं मैत्रीच्या नात्याची जागा घेतली. मरगळलेल्या वाटेवरून जाणं श्रेयस्कर ठरून योग्य वाटू लागलं. त्यामुळेच चाकोरीबद्ध आयुष्य जगण्यातच धन्यता मानणारी पिढी निर्माण झाली आणि कलेचा आनंद घेणं म्हणजे काय? हेच आपण विसरून गेलो. त्याची जाणीवच आपल्याला होईनाशी झाली.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कलेमुळे जीवन समृद्ध होतं, ही कल्पनाच मागे पडत गेल्याचं आपण प्रत्येकजण अनुभवत आहोत. त्यासाठी भारतीय कलेची सर्वांगीण चर्चा करताना इतिहासातील महत्वाच्या स्थित्यंतरांचा मागोवा घेणं आवश्यक असतं. प्राचीन भारतीय संस्कृती आजच्या इतकी प्रादेशिक आणि राजकीय सीमांनी बांधली गेलेली नव्हती. आजच्या भारतीय उपखंडाबरोबर पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण परिसरात फार दूरवर तिचा प्रभाव कालपरत्वे कमी-अधिक प्रमाणात अस्तित्वात असल्याची इतिहासात नोंद असल्याची सापडते. वंशविविधता आणि विविध धर्मश्रद्धा यांनी ती समृद्ध असल्याचं आपण विसरून चालणार नाही. संघर्ष पोटात सामावून घेत अभिसरण साधण्याची तिची ताकद विलक्षण आहे. जगण्यापलीकडील जीवनाच्या आदिम अवस्थेपासून आजवर तिची कित्येक संस्करणे होत प्रस्थापित संस्कृती म्हणून तिने विविध रूपे घेतली असल्याची साक्ष आपल्याला इतिहासात सापडते.



आधुनिक केसरी

## अनाथांची वारी | धन्य झाली ||

**कर्तव्याची जाण | असावी संसारी ||**
**शोधावी पंढरी | अंतरात ||१||**

**नसावा आकस | दुजाभाव उरी ||**
**भजावा अंतरी | पांडुरंग ||२||**

**जपावे वैराग्य | करूनी संसार ||**
**नेक व्यवहार | सुखदायी ||३||**

**सदा संतवृत्ती | ज्याच्या मनी वसे ||**
**माऊलीच दिसे | त्याचे ठायी||४||**

**मायबाप झाला | पंढरीचा हरि ||**
**अनाथांची वारी | धन्य झाली ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो**
**ज्ञानस्योपशमः श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्ययः ।**
**अक्रोधस्तपसः क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता**
**सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ।।**

**अर्थ :** ऐश्वर्याचे आभूषण सौजन्य, शौर्याचे आभूषण वाक्संयम, ज्ञानाचे आभूषण शांती, ज्ञानवानाचे आभूषण विनय, धनाचे आभूषण सत्पात्री व्यय, तपस्येचे आभूषण अक्रोध, सत्तेचे आभूषण क्षमा, तसेच निष्कपटता हे धर्माचे आभूषण आहे. पण समस्त गुणांचे कारण शील आहे. तेच सर्वश्रेष्ठ आभूषण होय. या श्लोकात कविराज भर्तृहरींनी शील म्हणजे चारिन्र्याचे महत्व प्रतिपादन केले आहे. ऐश्वर्यादि सर्व गुणांमध्ये शील महत्वाचे आहे. ते सर्व गुणांचे कारण आहे. तेच खरे सर्वश्रेष्ठ आभूषण आहे, असा आशय येथे अभिव्यक्त करण्यात आला आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



## ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

आपण दासबोधचा अभ्यास करत आहोत यात इतर गोष्टी सांगत बसणें म्हणजे उपदेश नाही. किंवा त्या सांगत बसू नये. तर परमार्थ मार्गात 'उपदेश'म्हणजे ब्रम्हज्ञानाचा मार्ग दाखवणे होय.माणसाने सार सोडून असाराचे सेवन करू नये. कसे ते प्रत्येक ओवीत थोडक्यात पाहूया.
संतांचा,देवाचा उपदेश थोडक्यात पाहूया.
पाखडलेल्या धान्याचा भुसा खाता येत नाही.
तसे ज्या उपदेशात ब्रम्हज्ञान नाही त्याला काही अर्थ नाही.
तुम्हाला ऊसाचा रस हवा आहे तर रसरशीत ऊसाच्या कांड्या घ्याव्यात. चरख्यातुन काढाव्यात. लोणी काढलेले ताक घ्यावे. आपण फळं खातो साली टाकुन देतो. नारळातलं खोबरं खातो. म्हणजे मित्रांनो तुम्हाला अर्थ कळला का ?समर्थाचा उपदेश असा की जे चांगले ते ते स्विकारावे.त्याच प्रमाणे ज्यात ब्रम्हज्ञान नाही ते ज्ञान काही कामाचे नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ब्रम्ह हे तर सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. आणि ते गुणातीत आहे. संपूर्ण विश्व हे पंचमहाभूतां पासून बनलेले आहे. पण ते कायमचे टिकणा्र नाही. अवनी, आप,तेज,वायु,व आकाश ही पंचमहाभूते आहेत. तर सारखा बदल होत रहाणे हा विश्वाचा मूळ स्वभाव आहे.
हे विश्व निर्माण होण्याच्या आधी आणि ते निर्वाण पावल्यावर शेवटी गुणातीत ब्रम्ह जसेच्या तसे असते आणि हीच खरी शाश्वतपणाची खरी खुण आहे. पंचमहाभूतांपासुन झालेले जे इतर सर्व काही आहे ते सर्व नाशवंत समजावे. विश्व आले आणि गेले तरी तिच्यामध्ये यत्किंचितही फरक पडत नाही तीचं सद्वस्तू होय. आपणास पाहिजे ते गुणातीत ब्रम्ह तसे आहे. नुसत्या मानवी द्रुष्टीने त्या कडे पाहिले तर तें भूत आहे. भूत या शब्दाला दोन अर्थ आहे।
1)भूत-- होऊन गेलेले
2)भूत-- पिशाचं योनीतील.
पहिला अर्थ घेतला तर जे झालेले आहे ते बदलते.म्हणून त्याला देव म्हणता येत नाही. म्हणून परमात्मा ला भेटताना वाईट विचार मनात आणू नये. तो निर्गुण निराकार आहे. म्हणून त्याला सतत भेटत रहावे.

## हेतू शुद्ध ठेवावा


आधुनिक केसरी

मनुष्याने शुद्ध हेतू ठेवण्याचा प्रयत्न करावा. हेतू शुद्ध असला की स्वाभाविकच कृती त्याला अनुरुप होऊ लागते आणि प्रगतीला मदत होते. हेतू हा विहिरीत असणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहे. झरा गोड पाण्याचा असला म्हणजे विहिरीचे पाणी स्वाभाविकच गोड असते. म्हणून हेतू शुद्ध ठेवण्याची दक्षता घ्यावी आणि त्याकरिता रामाची प्रार्थना करावी.
माणसाला देहरक्षणापुरते अन्न, वस्त्र आणि नाम घेण्याची बुद्धी असली की असमाधानाला जागा नाही. 'नको दैन्यवाणे जिणे भक्ति उणे' हेच रामराया जवळ मागावे.
पर्वकाळात भगवंत कामधेनूचा अवतार घेतो; जे ज्याला पाहिजे ते त्याला देतो. पर्वकाळात सज्जन तसेच दुर्जनही आपली कामे करून घेतात. जारण-मारण ही देखील पर्वकाळांतच शीघ्र साध्य होतात. आपण मात्र भगवंताचे कसे व्हावे हे पहावे. शुभेच्छा धरावी, भावना जागृत करावी. 'काहीही कर, पण भगवंता तुझा विसर पडू देऊ नकोस.' असे भगवंताजवळ मागावे. 'आजवर कळत नकळत जे पाप झाले असेल ते नाहीसे कर. पुढे पुनः नाही करणार,' असे म्हणावे, म्हणजे मागली पापे नष्ट होतात. ज्याला विषयाची गोडी असते त्याला



नाही परमार्थाची गोडी लागत. त्यांना 'मीच काय तो शहाणा, मोठा' असा अभिमान असतो. पण त्यांच्यापेक्षा लक्षावधी शहाणे आणि श्रीमंत जगात आहेत हे ते जाणत नाहीत. ते खालच्या लोकांकडे पाहतात आणि त्यांच्याहून मी श्रेष्ठ आहे असे म्हणतात. माझे चुकते आहे एवढे कळले तरी चालेल. विषयी लोकांना 'मला कुठे दुःख आहे' असे वाटते. पण दारूप्रमाणे विषयाची धुंदी उतरली म्हणजे पश्चात्ताप होतो. 'देव आहे' असे खऱ्या अर्थाने वाटणारे जगामध्ये थोडेच असतात. सद्विचार, सच्छास्त्र आणि सद्बुद्धि हे प्रत्येक माणसाला याच जन्मात भगवंताकडे नेण्यासाठी आहेत. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे. तापाने आजारी असलेल्या माणसाला आपल्याला घाम यावा असे वाटत असते. पण नुसत्या वाटण्याने काही तो येत नाही, त्यासाठी डॉक्टरचे औषध घ्यावे लागते. तसे, ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे हेच एक औषध घ्यावे. भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की त्याच्या आड दुसरे काही येत नाही. खाणीतल्या दगडामध्ये जसे सोने असते, तसा आपल्यामध्ये परमात्मा आहे. दगडातली माती अनेक चाळण्यांनी आणि यंत्रांनी काढून टाकतात आणि नंतर सोने हाती लागते, त्याचप्रमाणे अनेक वासना नष्ट झाल्यानंतर परमात्मा आपल्या हाती लागतो. आपण 'मी' पणाने मेल्यानंतर शेवटी परमात्मा प्रकट होतो.

**शुद्ध असावे आचरण ।तसेच असावे अंतःकरण ।**
**त्यात भगवंताचे स्मरण ।हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ॥**



सोयगाव : तालुक्यातील फर्दापूर येथील जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत गुरुवार व शुक्रवार दुपारी झालेल्या पावसामुळे अजिंठा लेणी क्रमांक २०/२१ मधील धबधबे वाहायला सुरुवात झाली आहे. वाघूर नदीला थोड्या प्रमाणात काही पाणी आले असून, यामुळे अजिंठा लेणीवरील लेनापूर गावकऱ्यांसह येथील व्यावसायिक व लेणीस भेट देणाऱ्या पर्यटकांना आनंद झाला आहे. असाच चांगला पाऊस होत राहिला तर सप्तकुंड धबधबा वाहायला वेळ लागणार नाही. लेणीला हिरवेगार रूप येण्यासाठी अजून काही अवधी बाकी आहे. हळूहळू लेणी परिसर व जंगल हिरवा होत असताना दिसत आहे. लेणीजवळ असलेल्या व्ह्यू पॉइंटकडे जाणाऱ्या मिनी पॉइंट छत्रीची दुरवस्था झाली असून, याकडे वन परिक्षेत्र अजिंठा विभागाने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सहाय्यक आयुक्त डॉ.सचिन मडावी यांचे निलंबन अखेर रद्द

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** संवेदनशील अधिकारी म्हणून ओळख असलेले डॉ.सचिन मडावी सहाय्यक आयुक्त यांचे अतिशय किरकोळ कारणाकरिता चुकीच्या पद्धतीने निलंबन करण्यात आले होते, त्यामुळे सर्व स्तरावरून असंतोष निर्माण झाला होता. प्रामाणिक अधिकारी यांना जर चुकीच्या पद्धतीने निलंबन करत असल्यास मग अधिकाऱ्यांनी काम करायचे कसे असे सुर अधिकारी वर्गातून उमटू लागले. त्यामुळे अशा प्रामाणिक अधिकारी यांच्या समर्थनात मोठ्याप्रमाणात पाठिंबा मिळत होता.

मूळचे विदर्भातील असलेले डॉ.सचिन मडावी हे मागील ८ वर्षापासून मराठवाड्यात समाज कल्याण अधिकारी म्हणून काम करत आहे. त्यांची युवकांमध्ये प्रचंड क्रेझ आहे. त्यांचे सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणावर आहे. बीड जिल्ह्यातील आश्रमशाळा चा मागील ५ वर्षात चेहरामोहराच बदलून टाकला आहे. रस्त्यावरच्या भीक मागणाऱ्या, वीट भट्टीवर काम करणारे, ऊसतोडीला जाणाऱ्या मुलांना शाळेत टाकले. पारधी मुलांना शाळेत टाकले. त्यांचे कामामुळे अतिशय लोकप्रिय अधिकारी म्हणून त्यांची पूर्ण महाराष्ट्रात ख्याती आहे. तसेच धनंजय मुंडे सामाजिक न्यायमंत्री यांच्या खास मर्जीतील अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळेच लोकप्रतिनिधी यांनी हा मुद्दा लावून धरला आणि अखेर शासनाला डॉ.सचिन मडावी यांचे निलंबन रद्द करावेच लागले. प्रामाणिक अधिकारी यांच्या पाठीशी आपण नेहमी उभे राहू असे सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी यांनी मत व्यक्त केले. यावेळी बाळू धानोरकर, विजय वडेट्टीवार, के.सी.पाडवी, श्रीमती.प्रतिभा धानोरकर, अशोक उईके, डॉ.देवराव होळी, धर्मराव बाबा आत्राम, डॉ. वजाहत मिर्झा, भीमराव केरांम, विजयकुमार गावित, राजू तोडसांम, मिलिंद धुर्वे, वामनराव कासावार, सुभाष धोटे या सर्व पक्षीय आमदारांनी एकत्रितरित्या मुद्दा लावून धरला आणि शासनाला निलंबन मागे घेण्यास भाग पाडले.

अवघ्या १० दिवसात निलंबन मागे घेण्याची ही बहुतांश पहिल्यांदाच घडल्याचे दिसले आणि यामुळे प्रामाणिक अधिकारी यांनी काम करताना कुठल्याही चुकीच्या प्रवृत्तीला घाबरण्याचे कारण नाही असे दाखवून दिले. विदर्भात मोठ्या प्रमाणावर रिक्त जागा असल्याने तसेच प्रामाणिक अधिकाऱ्यांची गरज लक्षात घेता सर्व लोकप्रतिनिधींनी त्यांची बदली विदर्भात करावी अशी शासनाला विनंती केली आणि त्यामुळेच लवकरच डॉ.सचिन मडावी जिल्हा समाज कल्याण अधिकारी म्हणून भंडारा जिल्ह्यात रुजू होणार आहे.



# पिंपळगाव काळे ग्रामपंचायत सरपंचपदी प्रिती गोपाल तायडे यांची अविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**पिंपळगाव काळे :** 23 जून रोजी पिंपळगाव काळे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये संरपच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. सरपंच पदासाठी सौ.प्रीतीताई गोपाल तायडे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बीनविरोधपणे सरपंच म्हणून निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणुन चव्हान साहेब यांनी काम पाहिले. 17 सदस्य संख्या असलेली जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळेची ग्रामपंचायत सर्वात मोठी आहे. विषेश म्हणजे तालुक्यातील सर्वात मोठी असलेल्या या ग्रामपंचायत मध्ये सरपंच आणि उपसरपंच दोन्ही महिलाच आहेत. यावेळी नवनिर्वाचित सरपंच सौ.प्रितीताई गोपाल तायडे यांचा मा. जि.प. अध्यक्ष प्रकाश पाटील, मा.जि.प.सदस्या पुजा पाटील यांनी सत्कार केला व गावातुन मोठ्या थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रामविकास अधिकारी ढगे साहेब, ग्रामपंचायत उपसरपंच सौ.भारतीताई बांगर, आशाताई कळसकार, यशोदाताई घटे, वंदनाताई निकम, उषाताई चोखंडे, दुर्गाताई मांडोकार, अजय ताठे, सचिन जाधव, नवलसिंग मावळे, नवल गोतरकर, शे. हारुण अतार, अशोक ढोले, मा.जि.प.सदस्य वासुदेव भोपळे, विनायक पाटील, महादेव घुटे, संतोष गवई, शालीग्राम भोपळे, श्रीकृष्ण गवई, सुधाकर घटे, गजानन तायडे, निळकंठ उमाळे, हरिदास वाघमारे, प्रभाकर मानकर, विजय बहादरे, ईनुस अतार, सुपडा पाटील, बंटी कळसकार, अरुण मानकर, मनु पाटील, सुपडा बांगर, श्रीकृष्ण वानखडे, भानुदास उशीर, सुनिल काकडे, मयुर राऊत, योगेश जाधव, किशोर घटे, विठ्ठल मुडोंकार, शे मुख्तार, अनिल इंगळे, शे आरीफ कुरेशी, मोहन भोपळे, उमेश बोदडे, योगेश जाधव, संतोष पडोळ, श्रीकांत वानखडे, निलेश मानकर, बालु राजपुत, उमेश मांडोकार, गोपाल तायडे, सुरेश चोखंडे, मंगल काकडे, गजू बोदडे, रवि ताठे, उदय सुरळकर, अमोल बांगर यांचेसह मोठ्या प्रमाणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# कण्व ब्राह्मण समाज संचलित महर्षी कण्व क्लिनिकचा आज शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील जिल्हा कण्व ब्राह्मण समाज संचलित महर्षी कण्व क्लिनिकच्या शुभारंभ कण्व भवन, कलावती शाळेच्या बाजुला, 12 वी योजना, शिवाजीनगर येथे शनिवार दि.25 रोजी दुपारी 12.30 वा. होणार असून यानिमित्त सत्यनारायण महापूजा निवेदिता व सुरेंद्र आनंदगावकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या क्लिनिकचे उदघाटन जिल्हा सामान्य रुग्णालय चिकलठाणाचे निवृत्त सिव्हील सर्जन डॉ. सुंदरराव कुलकर्णी यांच्या हस्ते होणार असल्याचे डॉ. कृष्णा देशपांडे यांनी सांगितले. या क्लिनिकबद्दल बोलताना देशपांडे म्हणाले की, नाममात्र शुल्कात अद्यावत सुविधेसह अनुभवी डॉक्टरांच्या निगराणीखाली समाजसेवा म्हणून चालवले जाणारे हे क्लिनिक आहे. या क्लिनिकमध्ये ॲलोपॅथिक व आयुर्वेदिक उपचार पद्धती, अनेक स्पेशालिस्ट डॉक्टर्सची मार्गदर्शक टीम असून महिन्यातून दोन दिवस विविध आजारावर उपचारासाठी स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या सेवा येथे उपलब्ध असतील. तर नियमित विविध आजारांवर शिबिरे तसेच लवकरच विविध रक्त व लघवी तपासण्यासाठी रक्त संकलन केंद्र सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी शुभारंभप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन औरंगाबाद जिल्हा काण्व ब्राह्मण समाज कार्यकारिणीने केले आहे.

# खंडणीसाठी चार वर्षीय चिमुकलीचे अपहरण; अवघ्या दोन तासात पोलिसांनी केली सुटका

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** चार वर्षीय चिमुकली घराच्या अंगणात खेळत असताना चॉकलेट देऊन तिचे अपहरण केले आणि नंतर तिच्या आई-वडिलांना सात लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली. खंडणी न दिल्यास त्या चिमुकलीला जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली. हा प्रकार एमआयडीसी बुटीबोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टाकळघाटनजीकच्या भारकस येथे (दि. २४) शुक्रवारी सकाळी घडला असून, पोलिसांनी घटनेच्या दोन तासात दोघांना अटक करून चिमुकलीची सुटका करीत तिला आई-वडिलांच्या स्वाधीन केले.

आकाश सोनवणे, रा. गणेशपूर, ता. हिंगणा व संकेत अनिल ठाकरे, रा. टेंभरी, ता. हिंगणा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. चार वर्षीय चिमुकली शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे तिच्या घराच्या अंगणात एकटीच खेळत होती. तिच्याकडे कुटुंबीयांचे लक्ष नसल्याचे पाहून आकाशने तिला चॉकलेट दाखवून जवळ बोलावले आणि तिला मोटारसायकलवर बसवून पळ काढला. चिमुकली अचानक दिसेनाशी झाल्याने घाबरलेल्या आई-वडिलांनी लगेच पोलिसांत तक्रार दाखल केली. चिमुकलीसह आरोपींच्या शोधार्थ पोलिसांनी चार पथके तयार केली होती. आरोपींचे मोबाइल लोकेशन ट्रेस करीत ते नागपूर-बुटीबोरी महामार्गावरील डोंगरगाव शिवारात असल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी सापळा रचला आणि चिमुकलीच्या जीवितास कोणताही धोका उद्भवणार नाही, याची विशेष काळजी घेत आरोपींवर झडप घातली. यात पोलिसांनी चिमुकलीसह आकाश व संकेतला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले. त्यानंतर दोघांना अटक करून चिमुकलीला सुखरूप तिच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले.



# 'एमपीएससी'चा महत्त्वपूर्ण निर्णय

आधुनिक केसरी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या राज्यसेवा परीक्षेच्या परीक्षा पद्धत आणि अभ्यासक्रमामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. या बदलाची अंमलबजावणी राज्यसेवा परीक्षा २०२३ पासून केली जाणार आहे. वर्णनात्मक स्वरुपाच्या प्रश्नपत्रिका, मुलाखत आणि लेखी परीक्षा मिळून २ हजार २५ गुण असे सुधारित योजनेचे स्वरुप आहे. एमपीएससीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य सेवा पूर्व परीक्षेतील पेपर क्रमांक दोन अर्थात सी सॅट हा विषय पात्रतेसाठी ग्राह्य धरण्याची मागणी उमेदवारांकडून करण्यात येत होती. या अनुषंगाने एमपीएससीने माजी सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी, माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक धनंजय कमलाकर, माजी कुलगुरू डॉ. एस.एफ. पाटील यांची समिती नियुक्त केली होती. या समितीच्या शिफारसीनुसार सी सॅट विषय पात्रतेसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय एमपीएससीने काही दिवसांपूर्वी जाहीर केला. या समितीच्या कार्यकक्षेमध्ये राज्यसेवेची परीक्षा योजना आणि अभ्यासक्रम सुधारित करण्याचाही समावेश होता. या संदर्भातील समितीच्या शिफारसीही एमपीएससीने स्वीकारल्या. सुधारित परीक्षा योजनेमध्ये वर्णनात्मक स्वरुपाच्या प्रश्नपत्रिका असतील. त्यात एकूण नऊ पेपरचा समावेश असेल. त्यातील भाषा पेपर एक मराठी, भाषा पेपर दोन इंग्रजी हे प्रत्येकी तीनशे गुणांचे विषय प्रत्येकी २५ टक्के गुणांसह अर्हताकारी असतील. तर मराठी किंवा इंग्रजी माध्यम निबंध, सामान्य अध्ययन १, सामान्य अध्ययन २, सामान्य अध्ययन ३, सामान्य अध्ययन ४, वैकल्पिक विषय पेपर क्रमांक एक, वैकल्पिक विषय पेपर क्रमांक दोन हे एकूण सात विषय प्रत्येकी दोनशे पन्नास गुणांसाठी असतील. मुलाखतीसाठी २७५गुण असतील. त्यामुळे एकूण गुण २ हजार २५ असतील. सामान्य अध्ययन एक, सामान्य अध्ययन दोन, सामान्य अध्ययन तीन या पेपरसाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्याशी संबंधित विषयांचा अभ्यासक्रमात समावेश असेल. तर सामान्य अध्ययन चार हा पेपर उमेदवारांची नैतिकता, चारित्र्य आणि योग्यता या विषयावर राहील. तसेच एकूण २४ विषयांतून उमेदवारांना वैकल्पिक विषय निवडता येईल. सुधारित परीक्षा योजना राज्यसेवा परीक्षा २०२३ पासून लागू करण्यात येईल. राज्यसेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल, असे एमपीएससीने स्पष्ट केले आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षेची सध्याची परीक्षा योजना आणि अभ्यासक्रम २०१२ पासून लागू होता. त्यात कालानुरूप बदल करून परीक्षा योजना आणि अभ्यासक्रमाची रचना नव्याने करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाधिक गुणवत्ताधारक उमेदवार मिळण्यास मदत होईल. तसेच सुधारित रचनेमुळे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यातील उमेदवारांचा टक्का वाढण्यासही मदत होऊ शकेल. असे मत एमपीएससीचे सहसचिव सुनील अवताडे यांनी व्यक्त केले आहे.

# भारतीय अर्थव्यवस्थेची वेगाने वाटचाल

आधुनिक केसरी

**भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल ही पाच ट्रिलियन डॉलर्सच्या दिशेने होत असून मधल्या कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे झालेले प्रचंड नुकसान आर्थिक पुनर्प्राप्तीच्या माध्यमातून भरून निघत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने यावर्षी एप्रिल 2022 मध्ये भाकीत केलेले होते की, भारत 2028-29 पर्यंत पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था बनू शकत नाही. परंतु आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या माहितीत संभ्रम निर्माण झाल्याने जागतिक आर्थिक आऊटलूक डेटाबेसमध्ये आपला अंदाज पुन्हा नव्याने सुधारणा केली आहे. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या (आयएमएफ) च्या ताज्या सुधारणेनुसार, आता भारत 2026-2027 पर्यंत पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठेल, म्हणजे सुरुवातीच्या अंदाजापेक्षा दोन वर्षे आधीच भारतीय अर्थव्यवस्था आपल्या ध्येयापर्यंत पोहोचत आहे.**

आर्थिक वर्ष भारतीय अर्थव्यवस्था 2027-28 मध्ये भारत 5.5 यूएस ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होईल, असा दावाही आपल्या नवीन अंदाजात करतानाच आपली चूक दुरुस्त केलेली आहे. या संदर्भातील स्वराज्यने आपला अहवाल दिलेला होता की, या अंदाजातील बदल हा अमेरिकन डॉलरच्या तुलनेत 84 पर्यंत रुपयाचे अवमूल्यन होऊन घसरेल. या गृहीतकामुळे झालेला आहे. हा अवमूल्यनातील बदल वाढून डॉलरच्या तुलनेत 94 रु. पर्यंत घसरत जाईल, असे मानले गेले होते.

आकडेवारीतील भारतीय अर्थव्यवस्था हा बदल 'टर्नअराऊंड फंडा'मुळे घडून आलेला आहे. खुले विचार आणि त्याचे गृहीतक दुरुस्त केल्यामुळे हा बदल घडून आलेला आहे. तुलनात्मक विकासातील हा बदल भारत आणि अमेरिका यांच्यातील चलनवाढीतील फरक असून विनिमय दरांबद्दलच्या गृहीतकांशी हा अधिक सुसंगत आहे. भारतीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा नाममात्र किंवा वास्तविक अर्थाने विचार केलेला नाही आणि प्रामु'याने डॉलर-रुपया विनिमय दरावर लक्ष केंद्रित केलेले आहे. गेल्या दोन दशकांत रुपयाच्या विनिमय दरांच्या वर्तनाचे निरीक्षण केले असता यात दोन गोष्टी लक्षात घेण्यासार'या आहेत. एक, सापेक्ष स्थिरतेची वर्षे आणि नंतर एक किंवा दोन वर्षे अर्थव्यवस्थेतील तीव' घसरण; त्यानंतर पुन्हा स्थिरतेचा कालावधी हा आहे, हे तपासणे आवश्यक असते. अमेरिकन डॉलर्सच्या तुलनेत रुपयाच्या सध्याच्या विनिमय दरातील घसरण हे नंतरचे उदाहरण आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी भारतीय भारतीय अर्थव्यवस्था अर्थव्यवस्थेत आर्थिक स्थिरता परत येण्याची अपेक्षा करायला हरकत नाही. आयएमएफने यापूर्वी व्यक्त केलेला अंदाज अधिकृतपणे मागे घेतलेला आहे. आता भारत 2026 मध्येच पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था झालेला देश असू शकेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आताचा भारताच्या भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक विकासाविषयी सुधारित अंदाज व्यक्त करताना त्यावेळी केलेल्या चुकीच्या अंदाजाविषयी, भारतीय 'पेड मीडिया'ने पंतप्रधान नरेंद्र मोदींची खिल्ली उडविली होती. मात्र, चुकीचे वृत्त प्रकाशित करूनही हा भारतीय 'पेड मीडिया' माफी मागणारच नाही. दरडोई जीडीपीच्या बाबतीत बांगलादेशने भारताला मागे टाकल्याचा वादग'स्त व चुकीचा दावादेखील यावेळी आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने केलेला होता. तो आता सुधारित केलेला आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने आता नव्याने असा दावा केला आहे की, भारताचा दरडोई जीडीपी 2027 पर्यंत बांगलादेशच्या बराच पुढे



राहील. आयएमएफच्या या स्पष्ट निष्कर्षामुळे बांगलादेशचा जीडीपी भारतापेक्षा अधिक राहील, हे वृत्त साफ खोटे ठरले आहे. आयएमएफसार'या आंतरराष्ट्रीय स्तरावरील एवढ्या मोठ्या संघटनेने एवढी गंभीर चूक करावी, याचेच सगळ्यांना आश्चर्य वाटते आहे. आता आयएमएफने आपल्या सर्वच अंदाजात सुधारणा केली आहे. यात हे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे की, देशातील अनेक नामवंत प्रसार माध्यम प्रकाशनांनी यापूर्वी आयएमएफबद्दलच्या सर्वच बातम्या प्रकाशित केलेल्या होत्या; ज्यात भारतासाठी पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी विलंबित टाईमलाईनचा अंदाज लावलेला होता. परंतु आता आयएमएफने भारतीय भारतीय अर्थव्यवस्था अर्थव्यवस्थेविषयी सुधारित आकडेवारी जारी करूनही या प्रकाशनांनी याची दखल घेतलेली नाही. यावरून या पेड मीडिया भारताची बदनामी करण्यासाठीच टपलेल्या आहेत, हे दिसून येते. जगातील पाचव्या क'मांकाची अर्थव्यवस्था ब्रिटनचा ताबा घेत असताना भारताने टॉप लीगमध्ये प्रवेश केलेला आहे.

आंतरराष्ट्रीय भारतीय अर्थव्यवस्था नाणेनिधी नुसार 2019 मध्ये फ्रान्स (2.71 ट्रिलियन) आणि इंग्लंड (2.83 ट्रिलियन) यांना मागे टाकत 2.94 ट्रिलियनच्या नाममात्र जीडीपीसह भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेला आहे. परंतु जीडीपी आकड्यांबाबत समस्या अशी आहे की, त्यांची पुनरावृत्तीही होत असते. याचा अंतिम डेटा मात्र केवळ दोन-तीन वर्षांच्या अंतराने येत असतो. दुसऱ्या शब्दात स्पष्ट सांगायचे झाले तर राष्ट्रीय उत्पादनाचे पहिले अंदाज हे बॉलपार्कचे आकडे असतात आणि ते वरच्या दिशेने आणि खालच्या दिशेने पुनरावृत्तीच्या अधीन होत असतात. आर्थिक वर्ष 2019 साठी भारताचे 2.94 ट्रिलियन ते 2.83 ट्रिलियन डॉलर्सपर्यंत सुधारित केले गेले, तर फ्रान्स आणि युकेचे अनुक्रमे 2.73 ट्रिलियन आणि 2.88 ट्रिलियनपर्यंत सुधारित केले गेलेले आहेत. मात्र, हा युकेचा आनंद अल्पकाळ टिकला.

आपल्या वसाहतवादी भारतीय अर्थव्यवस्था धोरणासाठी कुप्रसिद्ध असलेल्या ब्रिटनला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्था पहिल्या पाचमध्ये स्थान मिळविणार, असे वाटत होते. परंतु कोरोना काळात भारतीय अर्थव्यवस्थेला दिलेल्या धक्क्याने भारत सहाव्या स्थानावर स्थिरावलेला आहे. यातही एक चांगली गोष्ट अशी आहे की, आशियातील तिसरी-सर्वात मोठी अर्थव्यवस्था या आर्थिक वर्षात केवळ टॉप 5 मध्ये मोडण्याची शक्यता नाही तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या अंदाजानुसार पुढील पाच वर्षात जर्मनीच्या अर्थव्यवस्थेच्या एक स्थान पुढे जाण्याची शक्यता आहे. या वर्षासाठी भारत आणि युके यांच्यातील अंदाजित उत्पादन आणि 2027 साठी भारत आणि जर्मनी दरम्यानचे अंतर पाहता हे अंदाजे काहीसे विश्वासार्ह आहेत. याचा अर्थ असा आहे की, जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे स्थान निश्चित होण्याची दाट शक्यता आहे. आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये भारताचा जीडीपी 3.18 ट्रिलियन एवढा होता; जो युकेच्या 3.19 ट्रिलियनपेक्षा अगदी एक टक्का खाली होता. अर्थात, हे सर्व आकडे उजळणीच्या अधीन आहेत, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय भारतीय अर्थव्यवस्था अर्थव्यवस्था दोन देशाच्या आर्थिक व्यवहारातील अंतर वेगाने कमी करीत आहे. एकूणच आंतरराष्ट्रीय घडामोडीमध्ये ब्रेक्झिट अनिश्चितता, कोविडसंबंधित व्यत्यय आणि सध्या सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध यामुळे युकेमध्ये उत्पादन वाढीचा वेग अधिकच मंदावत आहे. येत्या काळात 2022 मध्ये आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने भारताची 3.53 ट्रिलियन अर्थव्यवस्था ब्रिटनच्या 3.38 ट्रिलियनला मागे टाकण्याचा अंदाज वर्तविलेला आहे. सन 2027 पर्यंत युकेची अर्थव्यवस्था 4.55 ट्रिलियन डॉलर्स असेल, तर भारताची अर्थव्यवस्था अर्थव्यवस्था 1 ट्रिलियन डॉलर्सच्या मार्जिनसह 5.53 ट्रिलियन डॉलर्सवर स्थिरावलेली असेल. या अंदाजानुसार 2027 पर्यंत 5.36 ट्रिलियन डॉलर्स एवढा नॉमिनल जीडीपी असलेल्या जर्मनीच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकण्यास भारतीय अर्थव्यवस्था तयार आहे. सध्यातरी तिसऱ्या क्रमांकावर जपान आहे, ज्याची भारतीय अर्थव्यवस्था अर्थव्यवस्था 2022 मध्ये 4.91 ट्रिलियन डॉलर्सवरून 6.26 ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. भारताच्या 5.53 ट्रिलियन डॉलर्सच्या तुलनेत ती 1 ट्रिलियनपेक्षा कमी आहे आणि त्यात भविष्यात कोणतेही मोठे अडथळे नसतील. येणाऱ्या काळात सात ते आठ टक्के वास्तविक जीडीपी वाढ दर कायम राहिल्यास, जपानच्या तिसऱ्या स्थानाशी स्पर्धा करण्याचे उद्दिष्टदेखील शक्य आहे.

**प्रा. विजय रामचंद्र शिंदे**

# आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्त्व कळले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ४७ वर्ष पूर्ण झाली. बरोबर ४७ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला.**

या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली.



जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला.

संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४७ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समाधान

आधुनिक केसरी



एक श्रीमंत सावकार होते, अलोट संपत्ती होती, पुढील सातपिढ्या जरी बसून खाल्या तरी संपणार नाही एवढी संपत्ती मिळवली होती, तरी पण हा श्रीमंत सुखी नव्हता. मनात काहीतरी विवंचना होती त्यामुळे रात्रभर झोप यायची नाही त्यामुळे खऱ्या सुखाला तो वंचित झाला होता. त्याने प्रत्येकाला विचारावे मी काय करू म्हणजे या विवंचनेतून मी सुटेन आणि मला सुखाची झोप लागेल ! त्याला कोणीतरी सांगितले तू संताना शरण जा म्हणजे संतचं यातून तुला सोडवतील. श्रीमंत संतांच्या शोधार्थ निघाला वाटेत एका झाडाखाली एक साधु महाराज बसले होते त्याना नमस्कार करून श्रीमंत म्हणाला महाराज मला काहीही कमी नाही पुढील सात पिढ्या बसुन खातील एवढं मिळवलं आहे तरी मी सुखी नाही, एक विवंचना मला झोप येवु देत नाही त्यामुळे मी सुखी नाही.

साधु महाराज म्हणाले आधि विवंचना काय आहे ते सांग म्हणजे त्यातून कसे सुटायचे ते सांगतो, श्रीमंत म्हणाला महाराज तसं म्हणाल तर मला काहीही विवंचना नाही पण एकच विवंना आहे आणि ती म्हणजे माझ्या आठव्या पिढीचे काय होईल ? कारण सात पिढ्याचे कमवून ठेवले आहे चिंता आहे ती आठव्या पिढिची !

साधु महाराज हसले आणि म्हणाले काळजी करु नकोस मी तुला यातून सोडवतो.

साधुनि त्याला एक किलोभर तांदळाची पिशवी दिली आणि सांगितले की त्या डोंगरावर एक म्हातारी एका झोपडीत राहते तिला हे तांदूळ देवून ये म्हणजे मी तुला तुझ्या विवंचनेतून मुक्त करतो.

तांदूळ घेऊन श्रीमंत म्हातारीच्या झोपडीत आला ज्या झोपडीला दार सुद्धा नव्हते. ती भगवंताच्या भजनात दंग होती, तिची भावसमाधी लागली होती, श्रीमंताच्या पायाच्या आवाजाने आजीची भावसमाधी भंग पावली, तिने वर बघितले आणि म्हणाली का आलास बाबा ईथे ? तो म्हणाला म्हातारे तुला तांदूळ द्यायला आलो आहे हे घे मग मी जातो. ती म्हणाली कारे तुला मागीतले होते का ? तुझ्या समोर हात पसरला होता का ? नाही ना ? मग का आणलेस तांदूळ ? ही पिशवी उचल आणि चालायला लाग तो म्हणाला मला त्या झाडाखाली बसलेल्या साधुने पाठवले आहे म्हणून मी आलोय, ती म्हणाली त्या साधुला जाऊन सांग की अजून दोन दिवस पुरतील एवढे तांदूळ माझ्या झोपडीत आहेत.

श्रीमंताने आपली अक्कल चालवली तो म्हणाला म्हातारे तिसऱ्या दिवसाला होतील राहू दे. ती म्हणाली माझ्या तिसऱ्या दिवसाची चिंता तुलाही नको आणि त्या साधुलाही नको त्याला सांग माझ्या तिसऱ्या दिवसाच्या तांदळाची चिंता मी ज्याच्यावर सर्वस्वाचा भार टाकून या निर्जन स्थळी भजन करत बसलेय त्याला आहे.

हे ऐकून श्रीमंत पिशवी घेऊन परत आला आणि साधु समोर पिशवी ठेवून निघाला. साधुने त्याला हाक मारली अरे ! विवंचना घेऊन आला होतास ना ? मी तुला त्यातुन सोडवणार आहे. श्रीमंत खाली मान घालून म्हणाला महाराज मला उत्तर मिळाले तिसऱ्या दिवसाच्या तांदळाची चिंता न करणारी म्हातारी जेवढी सुखी आहे तेवढा मी महामूर्ख दुःखी आहे.

**अर्थात : या कथेचा आशय हा आहे की, सुख कशात आहे हेच आम्हाला कळत नाही. तर सुख समाधानात आहे. आणि हे समाधान बाजारात विकत मिळत नाही. ते भगवंताच्या भजनानेच मिळते. भोजनात सुख नसून भजनात सुख आहे. आमच्या जीवनातील भजन नाहीसे झाले आणि आम्ही भोजनाला प्राधान्य दिले म्हणून आम्ही दुःखी आहोत.**

# जंगलाचा खरा राजा

आधुनिक केसरी



एकदा एका जंगलामध्ये खेळाची स्पर्धा भरली होती त्या स्पर्धेत जो अधिक साहसी खेळ करून दाखविल तो विजेता असेल असे ठरले होते, त्या स्पर्धेत माकडाने सर्वाधिक साहसी खेळ करून दाखवले. झाडावर चढणे, उतरणे, लांब उडी मारणे, झाडाच्या टोकाला लोंबकाळणे असे अनेक खेळ दाखवून आपण किती साहसी आहोत, याचे दर्शन माकडाने सर्वांना घडवले. जंगलातील इतर प्राणी फार प्रभावित झाले आणि त्यांनी माकडाला राजा म्हणून निवडले. पण तेव्हापासून माकड मात्र खूपच अरेरावीने आणि तुच्छतेने वागू लागले जंगलातील प्राण्यांचा ते येता जाता अपमान करू लागले.

ही बाब कोल्ह्याने सिंहाला सांगितली. कोल्ह्याने आपल्याविरूध्द तक्रार केली हे समजताच. माकड कोल्ह्याला त्रास देऊ लागले. त्याचा अपमान करू लागले. कोल्ह्याने माकडाला खूप समजावले राजा होणे ही सोपी गोष्ट नाही. राजाचा फारच सजग रहावे लागते. मात्र, माकडाला जंगलाचा राजा असल्याचा फारच अहंकार झाला होता, त्याने कोल्ह्याचे काहीच ऐकले नाही. एक दिवस कोल्ह्याने ठरवले की माकडाची खोडचं मोडायची, आणि तेव्हाच जंगलाच पारध्याने प्राणी पकडण्यासाठी जाळे लावले होते. हे कोल्ह्याने हळूच पाहिले आणि तो माकडाजवळ आला आणि म्हणाला, "महाराज, चला; इथे थोड्या अंतरावर आपल्यासाठी मेजवानी ठेवली आहे."

आजवर आपल्याला शहाणपण सांगण्याऱ्या कोल्ह्याने इतक्या अदबीने दिलेले निमंत्रण पाहून माकड फारच आनंदी झाले. त्याला वाटले खरंच आपल्यासाठी मेजवानी आहे. म्हणून तो पुढे निघाला आणि पारध्याच्या जाळ्याता अडकला. काही केल्या तेथून निघता येईना तो आरडाओरडा करू लागला शेजारी उभे राहून कोल्हा हे सारे पाहत होता. आपल्याला फसवले हे माकडाच्या लक्षात आले. तेव्हा कोल्हा त्याला म्हणाला, "असा कोणाच्याही बोलण्यावर डोळे झाकून विश्वास ठेवणारा मूर्ख पशू कधीच राजा होऊ शकत नाही. राजा प्रत्येक वेळी प्रसंगावधान राखणारा असावा लागतो नाहीतर अशी फसगत होते."

**तात्पर्यः जीवनात प्रसंगावधान नेहमीच महत्वाचे असते.**

**प्रा.भावना गांधिले, अ.नगर**

# खरा संत कोण..?

आधुनिक केसरी



एक संत महात्मा नदीच्या पलीकडे रोज जात असे. तिथं त्याचा आश्रम होता.

त्याला एक होडीवाला गरीब माणूस रोज पलीकडे सोडत असे. पण तो संत आहे म्हणून त्या बदल्यात त्यांच्याकडून एक पैसा सुद्धा घेत नसे.

तसं पाहायला गेलो तर संताजवळ तरी कुठे पैसा असतो.?

होडीवाला बिचारा साधा सरळ होता. समज कमी होती. अज्ञानी होता. तो संत रोज जाता येता त्या होडी वाल्या जवळ पारमार्थिक विचार बोलायचं. देवावर चर्चा व्हायची, देवाबद्दल बोलणं व्हायचं. होडीवाला अगदी श्रद्धेने ध्यान देऊन त्या गोष्टी ऐकायचा.

एक दिवस तो संत होडीतून उतरल्यानंतर त्या होडीवाल्याला आपल्या आश्रमात घेऊन गेला आणि म्हणाला.

"बाबा रे मी पूर्वी एक मोठा व्यापारी होतो, पुष्कळ पैसा कमवला. पण माझ्या वर एक असा प्रसंग आला की, मी माझ्या कुटुंबाला, बायको मुलांना वाचवू शकलो नाही. आता माझे कुटुंबंच राहिले नाही तर हा पैसा माझ्या काय कामाचा. मी सारे सोडले, संन्यासी झालो. पण पैसा मात्र अजून तसाच ठेवला आहे. कोणी योग्य माणूस भेटला तर देणार आहे."

"तू गरीब आहेस तुला पैशाची गरज आहे, तू हा सगळा पैसा घे, तुझं जीवन श्रीमंत होईल, सुखी होईल त्या तुझ्या कुटुंबाचं भलं होईल."

त्यावेळेला त्या गरीब होडी वाल्याने हात जोडले आणि नम्रपणे म्हणाला.

"नाही महाराज, हा पैसा मी घेऊ शकत नाही, फुकटचा पैसा जर मी घरी घेऊन गेलो तर आपण सांगितलेला परमार्थाचा काय उपयोग.?"

"मी हा पैसा घेतला तर माझ्या आचरणात बिघाड होईल. घरातली माणसं आळशी बनतील. कोणीही काम करणार नाही. लालच, आसक्ति वाढेल."

"महाराज आपण मला ईश्वराच्या बाबतीत सांगितलं, ज्ञानेश्वरी सांगितली मला तर आजकल नदीच्या लाटा मधे सुद्धा देव दिसतो. जर तो मला दिसतो, तो मला पहातो, मी त्याला पहातो तर मग मला आणखी काय हवे.?"

"आपणामुळे मला तर खूप मोठे धन मिळाले, मग हे नाशिवंत, दुःख देणारे धन घेवून मी काय करु?"

"महाराज. मी माझे काम करीत राहीन, आणि बाकी सारे देवावर सोडून आनंदाने नाम घेत जीवन जगत राहीन. मला हा पैसा नको"

गोष्ट संपली पण एक प्रश्न निर्माण झाला. या दोन माणसा मधील संत कोण आहे.?

एक तो श्रीमंत आहे ज्याने आपल्या वर दुःख आल्या बरोबर भगवे कपडे घातले. संन्यास घेतला, ग्रंथांचा अभ्यास केला आणि दुसऱ्यांना समजावून सांगू लागला. पण तरी सुद्धा पैशाची ममता सोडू शकला नाही. पैसे देण्यास कोण योग्य आहे अश्या माणसाच्या शोधात राहिला आणि दुसऱ्या बाजूला तो होडीवाला आहे.

ज्याला सकाळी खायला मिळाले तर संध्याकाळी मिळेल असे नाही. पण तरी सुद्धा दुसऱ्याचा पुष्कळ पैसा मिळत असून सुद्धा त्याचे मन लालचावले नाही, मोह झाला नाही.

भगवे धारण न करता, संन्यास न घेता, संसारात असून सुद्धा, त्या संताचा उपदेश ऐकून, देवावर विश्वास ठेवून, देवाचे नाम घेत जीवन जगणे शिकून, विषयांची आसक्ति न करता, पैशाला ठोकर मारुन, परमार्थ करणारा हा सामान्य गरीब माणूस खरा संत आहे.

**रविंद्र व्ही. चालीकवार,**
**महागाव, जि. यवतमाळ,**
**मो.9011559106**

## आई, ज्ञानपोई होईन..!

आई, मी ज्ञानपोई होईन
मुला-मुलींना गोष्टी सांगेन,
त्यांच्यासाठी कविता गाऊन
नव्या-नव्या कथा या वाचीन.

आई, मी ज्ञानपोई होईन
गणिताची कोडे सोडविण,
इतिहास हे सोपे करून
भूगोलात चंद्रतारे दाखविण.

आई, मी ज्ञानपोई होईन
सगळ्यांची परीक्षा घेईन,
त्यांची बुध्दीमत्ता तपासून
योग्य मूल्यमापन करीन.

आई, मी ज्ञानपोई होईन
बाळांसाठी अंगाई गाईन,
मोठ्यासाठी पुस्तक होऊन
त्यांना ज्ञान अमृत पाजीन.

आई, मी ज्ञानपोई होईन
साऱ्या जगाची माहिती देईन,
सगळे होतील बुध्दीमान
त्यांची ज्ञानाची तहाण भागविण...!

## अक्षरांचे खेळ...!

एकदा अशी भन्नाट
गंमत- जंमत झाली,
पुस्तकातली सगळी
अक्षरे पळू लागली.

अक्षरांनी सोडल्यात
आपापल्या मूळ जागा,
अक्षरे करू लागले
मस्ती नी धांगडधिंगा.

कोणी-कोणी खेळतात
झिम्मा- लगोरी, फुगड्या,
कोणी-कोणी मारतात
उंचंच कोलांटया उडया.

रमेशला अक्षरांचा
खेळ समजेना काही,
डोळे चोळत-चोळत
अक्षरांकडे पुन्हा पाही.

रमेश आईला मागे
गोड-गोड, लॉली पॉप,
आई रमेशला म्हणे,
" आहे ना गंमत टॉप."

अय्युब पठाण लोहगावकर

## आजीची काठी

कोपऱ्यात उभी आहे
आजीची काठी
दुरुन बघा बरं
जावू नका वाटी

आजीची काठी
लांबच लांब
मनी मोत्यालाही
फुटतो घाम

आजीची काठी
फिरते गावभर
दमून आल्यावर
गाठते आपले घर

घराचे रक्षण करी
आजीची काठी
चोर पळून जाई
जेव्हा बसता पाठी

आजीची काठी
आहे तरी काय ?
आजीचा जणू
तीसराच पाय



- रविंद्र व्ही. चालीकवार, महागाव, जि. यवतमाळ, मो.9011559106





# आता प्रेम करणे पडेल महागात




सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**भांडणं आणि ब्रेकअप हे तसं पाहता सध्याच्या तरुणांसाठी थोडं कॉमन झालं आहे. प्रेम किंवा नातं म्हटलं की, भांडणं तर येतातच. परंतु आजकालची तरुण मंडळी आधी काहीही विचार न करता प्रेम करतात आणि मग ते नातं सहज संपवतात. ज्यामुळे त्यांना ब्रेकअपच्या प्रक्रियातून जावे लागते. प्रेमात लोक एकमेकांसाठी काहीही करायला तयार असतात. एवढंच काय तर एकमेकांमधील कमतरता देखील तेव्हा त्यांना दिसत नाही. परंतु ते जेव्हा वेगळे होतात, तेव्हा मग ते जोडीदारामधील कमतरता मोजून दाखवू लागतात.**

जेव्हा लोक एकमेकांच्या प्रेमात असतात, तेव्हा मोठ्यात मोठी वस्तू देण्यात माघार घेत नाही. परंतु जेव्हा हे नातं टुटते, तेव्हा प्रत्येकजण हे करू शकत नाही. जे चीनच्या शांघाई मध्ये राहणाऱ्या तरुणाने केले. हा तरुण आपल्या प्रेयसीला १ वर्षापासून डेत करत होता. जेव्हा त्यांचं नातं तुटण्याच्या डगारवर पोहोचलं, तर युवकाने मजेशीर पाऊल उचललं. त्याने एकूण ३ पेज डेटिंगवर केलेल्या खर्चाचा कॉम्प्युटराइज्ड लॉग तयार केला.



असं एक विचित्र प्रकरण चीनमधून समोर आलं आहे. ज्यामध्ये ब्रेकअप केल्यामुळे भलीमोठी शिक्षा मुलीला मिळाली आहे. सोशल मीडियावर मिळालेल्या माहितीनुसार एका तरुणाच्या प्रेयसीने त्याच्याशी ब्रेकअप केलं. ज्यामुळे त्याने आपल्या गर्लफ्रेंडला ब्रेक अप बिल पाठवलं. जे पाहून गर्लफ्रेंडला धक्काच बसला. कदाचित हे बिल पाहून तिला ब्रेकअप केल्याचा पश्चाताप होत असावा.

हे प्रकरण ऐकायला खूप मजेदार वाटत असलं तरी त्या व्यक्तीने हे खरोखर केलं आहे. या तरुणाने आपल्या गर्लफ्रेंडवर केलेला खर्च एकत्र लिहून ठेवला आणि या खर्चाची भलीमोठी यादी तिला पाठवली आणि हे पैसे तिला परत करण्यासाठी सांगितले. खर्चाचा ब्रेकअप लॉग सध्या चीनच्या सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय होत आहे. पाण्याच्या बाटलीपासून ते चिप्स आणि इतर स्नॅक्सपर्यंतचा हिशेबही या लॉग लिस्टमध्ये लिहिला गेला आहे. परिस्थिती काहीही असो, पण मुलाची स्मरणशक्ती आणि सर्जनशीलतेची लोक कौतुक करत आहेत, तर अनेकांना त्याचं हे वागणं पटलेलं देखील नाही.

व्यक्तीने तयार केलेल्या यादीत किरकोळ खर्चही लिहिला आहे. यामध्ये २ पाण्याच्या बाटल्या आणि स्नॅक्सचा खर्चही समाविष्ट आहे. मुलीने एकटीने खाल्लेला नाश्ताही लिहिला आहे आणि जोडप्याचा खर्चही लिहिला आहे. रात्रीचे जेवण आणि जेवणाचा खर्च त्याने दोघांमध्ये अर्ध-अर्धा केला आहे. मुलीची आई आजारी पडली होती, तेव्हा रुग्णालयात दाखल करण्याचा खर्च आणि तिच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी देण्यात येणारा खर्च देखील या यादीत नमूद केला आहे.

ही संपूर्ण रक्कम ६,०१,४७,०२५ युआन म्हणजे भारतीय चलनात सुमारे ७ लाख रुपये आहे. मुलीने त्याला हे पैसे दिले की, नाही हे माहित नाही. परंतु हे जोडपं या प्रकरणानंतर भलतंच चर्चेत आलं आहे.

# शनीची मुर्ती काळी का असते ?

आधुनिक केसरी

**स्मशानात चितेवर महर्षी दधीचिंच्या अस्थिविहीन कलेवरावर दाह संस्कार होत होता आणि तिकडे त्यांच्या आश्रमात त्यांची भार्या पतिवियोगानं वेडीपिशी झाली होती. दुःखावेग सहन न झाल्यानं शेवटी तिनं आपल्या आश्रमातील पिंपळाच्या झाडातील ढोलीत आपल्या तीन वर्षांच्या चिमुरड्याला ठेवून दिलं आणि ती पतीच्या चितेवर बसून सती गेली. अशा प्रकारे महर्षी दधिची यांच्यासोबतच त्यांच्या पत्नीनंही देवांच्या लढाईत आपलं बलिदान दिलं. इकडे पिंपळाच्या झाडाच्या ढोलीत ठेवलेल्या त्या बाळानं तहान भुकेसाठी आकांत मांडला. खायला कांहीच न दिसल्यानं त्यानं ढोलीत पडलेल्या पिंपळाची फळं खाल्ली. त्या दिवसापासून पिंपळ वृक्षाची फळं आणि पानं हाच त्याचा आहार झाला. झाडाची ढोली हेच त्याचं घर झालं. हळू हळू ते बालक मोठं होऊ लागलं. झाडाच्या ढोलीत त्याला सुरक्षित वाटू लागलं.**

एके दिवशी देवर्षी नारद तिथून जात असता त्यांना पिंपळवृक्षाच्या ढोलीमध्ये एक लहान मुलगा दिसून आला. नारदाला आश्चर्य वाटले. त्यांनी त्या लहान मुलाला प्रश्न विचारून त्याचेकडून त्याच्याबद्दलची माहिती काढून घेतली -

नारद- हे बालका, तू कोण आहेस?

बालक- मलाही ते माहित नाही. मला तेच जाणून घ्यायचं आहे.

नारद- तुझे आईवडील कोण आहेत?

बालक- मला तेही माहित नाही. मलाही तेच जाणून घ्यायचं आहे

तेव्हा नारदानं ध्यान लावलं आणि नारदाला जे कळलं त्यामुळे नारदांना महदाश्चर्य वाटलं. ते म्हणाले, "हे बालका, तू महादानी अशा महर्षी दधिचीचा पुत्र आहेस. तुझ्या पित्याच्या अस्थींच्या साहाय्यानंच देवांनी वज्र नामक अस्त्र तयार केलं आणि त्या अस्त्राच्या साह्येकरूनच देवांना असुरांवर विजय मिळविणं शक्य झालं. तुझ्या पित्याचा मृत्यू झाला तेव्हा त्यांचं वय अवघं एकतीस वर्षांचं होतं.

बालक- माझ्या पित्याच्या अकाल मृत्युचं कारण काय होतं ?

नारद- तुझ्या पित्याची शनीची महादशा सुरु होती.

बालक- माझ्यावर हे असं भयानक संकट यायचं कारण काय असावं?

नारद- शनिदेवाची महादशा.

एव्हढं सांगून नारदानं पिंपळ वृक्षाची पानं आणि फळं खाऊन जगणाऱ्या त्या बालकाचं पिप्पलाद असं नामकरण केलं आणि त्याला ज्ञानाची दीक्षा दिली.

नारद निघून गेल्यानंतर बालक पिप्पलादनं नारदानं सांगितल्याप्रमाणे ब्रह्मदेवाची घोर तपश्चर्या करून त्यांना प्रसन्न करून घेतलं. ब्रह्मदेवानं पिप्पलादाला वर मागायला सांगितलं तेव्हा पिप्पलादनं 'मी ज्याच्याकडे पाहीन ते त्याच क्षणी भस्म होऊन जावं' असा वर मागितला. ब्रह्मादेवानं "तथास्तु" म्हणून पिप्पलादाला तसा वर दिला. हा वर मिळाल्याबरोबर पिप्पलादनं सर्वप्रथम शनिदेवांना आवाहन केलं. त्याबरोबर शनिदेव प्रगट झाले. शनिदेव समोर येताच पिप्पलादनं आपली नजर त्यांच्यावर रोखली. त्याबरोबर शनीच्या अंगाचा प्रचंड दाह होऊन त्यांचं शरीर जळू लागलं. हे पाहून समस्त ब्रह्माण्ड हादरलं. सूर्यपुत्र असलेल्या शनिदेवांना वाचवणं ब्रह्मदेवांनी पिप्पलादाला दिलेल्या वरामुळे देवांना अशक्य झालं. प्रत्यक्ष सूर्यदेवही आपल्या मुलाचं शरीर आपल्या नजरेसमोर जळताना पाहून ब्रह्मदेवाला त्याच्या प्राणांची भीक मागू लागले. शेवटी स्वयं ब्रह्यानं पिप्पलादाला त्यानं शनिदेवांना सोडून द्यावं अशी विनंती केली. पण पिप्पलादनं ती विनंती धुडकावून लावली. शेवटी ब्रह्मदेवानं पिप्पलादाला एका ऐवजी दोन वरदान देण्याचं कबूल केलं. मग मात्र पिप्पलादाला आनंद झाला आणि त्यानं ब्रह्मदेवाची विनंती मान्य केली. पिप्पलादनं ब्रह्मदेवाला दोन वर मागितले -

1- जन्मानंतर पहिली पाच वर्षे कुठल्याही बालकाच्या कुंडलीत शनीला स्थान असणार नाही ज्यामुळे यापुढे कोणताही बालक माझ्यासारखा अनाथ होणार नाही.

2- माझ्यासारख्य अनाथाला पिंपळ वृक्षानं आश्रय दिला आहे. म्हणून जी व्यक्ती सूर्योदयापूर्वी पिंपळ वृक्षाला जलार्पण करील त्या व्यक्तीवर शनीच्या महादशेचा कुठलाही प्रभाव पडणार नाही.

"तथास्तु" म्हणत ब्रह्मदेव तिथून गुप्त झाले. तेव्हा पिप्पलादनं आगीत जळणाऱ्या शनिदेवाच्या पायांवर आपल्या ब्रह्मदंडानं आघात करून त्यांना शापामुक केलं. ब्रह्मदंडाच्या आघातानं शनीचे पाय अधू झाले आणि त्यामुळे त्यांना पाहिल्यासारखं चालता येईना. म्हणून तेव्हापासूनच शनि "शनैःचरति यः शनैश्चरः" अर्थात जो हळू हळू चालतो त्याला शनैश्वर म्हटल्या जाते. आणि आगीमध्ये अंग भाजल्यानं शनीची काया काळी ठिक्कर पडली. .

शनीची मूर्ती काळी कां आहे आणि पिंपळ वृक्षाची पूजा कां केली जाते याचं रहस्य वरील कथेत दडलेलं आहे. पुढे पिप्पलादनं प्रश्नोपनिषदाची रचना केली. आजही हे उपनिषद ज्ञानाचं कधीही न संपणारं भांडार म्हणवल्या जातं.



# सहनशीलता यशाच्या वाटेवरील अदभूत गुण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वेगवेगळ्या गुण वैशिष्ट्यांमुळे आपलं मुल्यमापन व सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील सर्वांगिण विकास होत असतो. या सर्व पार्श्वभूमीवर काही महत्त्वाच्या गुणांपैकी सहनशीलता हा कठीण पण अदभुत गुण आहे. अपयशाने खचने नाही खडतर संघर्षाला घाबरणे नाही.संकटांची अनेक शिखरे पार करताना डळमळित न होता सहनशीलता कायम टिकवून ठेवता आली तर मग मात्र यशाच्या शिखरापर्यंत पोहचण्यामध्ये काही अडचण येणार नाही.**



मनाविरुद्ध घटनाक्रम घडुन सुद्धा न थकता, न घाबरता अगदी स्थैर्य पुर्वक सगळ्या घटनांना सामोरे जाण्यामध्ये जर आपण यशस्वी झालो आणि दरम्यानच्या काळात आपल्याला सहनशीलता बाळगता आली तरी नक्कीच आपण यशाच्या शिखरापर्यंत पोहचणार यामध्ये शंका नाही. आपलं यश-अपयश हे मुख्यत्वे सहनशीलतेवर अवलंबून असतं. जीवनात विविध अशा, अपेक्षा, महत्वकांक्षांचे ओझ घेऊन आपण जीवन जगत असतो. आणि यामध्ये काही अपेक्षा महत्त्वाकांक्षा पुर्ण होण्यासाठी आपल्याला खुप खडतर संघर्ष करावा लागतो. अनेका समस्यांना सामोरे जावे लागु शकते. तेंव्हा मग या कठीण प्रसंगी सहनशीलता आवश्यक आहे, महत्वपूर्ण आहे. आपल्याकडे एक मन सर्वश्रुत आहे.

**पाण्याची सुद्धा चाळणी मध्ये साठवण होऊ शकते.....!**

परंतु त्यासाठी पाण्याचा बर्फ होईपर्यंत सहनशीलता असेल तरच हे शक्य आहे. आणि सध्याच जग तर प्रचंड उतावीळ आहे. याच उतावीळ पणामुळे अनेक बाबतीत नुकसान सुद्धा होत असतं. सर्वगुणसंपन्न असुनही जवळपास पन्नास ते साठ टक्के लोक आपल्या धेय्य पर्यंत पोहचत असताना सहनशीलता नसल्यामुळे अतिप्रचंड मेहनत करून सुद्धां त्या योग्य परिणामांना गवसणी घालू शकत नाहीत. म्हणजे हाती आलेल यश सुद्धा आवश्यक असणारी सहनशीलता न बाळगल्या मुळ संपुष्टात येऊन पुन्हा शुन्यावर येण्याची स्थिती उद्‌भवते. या सगळ्या गोष्टींना आपली सहनशीलता कारणीभूत असते. प्रत्येक व्यक्तीच आपल्या जीवनाशी निगडित एक अंतिम धेय्य निश्चित झालेलं असतं. हेच अंतिम धेय्य पुर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपल्या संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करत असतो. मात्र हे प्रयत्न करत असताना अनेक वेळा कठीण खडतर अशा परस्थितीला सुद्धा सामोरे जाण्याची वेळ आपल्यावर येऊ शकते. मग अशा वेळी कामी येते ती सहनशीलता.....!

कारण सहनशीलता नसल्याकारणाने जगातील पन्नास ते साठ टक्के लोकांना आपल्या दृष्टीक्षेपात आलेल यश सुद्धा पराभवात-अपयशात रूपांतरित होण्यासाठी कारणीभूत असतं. सर्वसाधारणपणे आपण आपल्या आजूबाजूला असणाऱ्या जगाचं अवलोकन केले तर एक गोष्ट आपल्या लक्षात येते. प्रत्येक व्यक्तीला यशस्वी होण्याची मनोमन ईच्छा आहे. आणि तसे प्रयत्न पण त्या क्षेत्रात चालू असतात. पण मग एवढे सगळं प्रयत्न करून नेमकी अडचण कुठे उद्‌भवते. तर अडचणी ही नसतीच मुळात. फक्त त्यासाठी आवश्यक असणारी प्रचंड अशी सहनशीलता आपल्याकडे नसते. आणि मग याच सहनशीलता मुळे आपण आपल्या जीवनातील अंतिम ध्येया पासून वंचित राहतो. तेंव्हा आपल्या जर कुठल्याही परिस्थितीत यशस्वी होयचच असेल तर सहनशीलता ही मात्र असलीच पाहिजे......!!

# जैसी करनी वैसी भरणी, रद्द झाली वेतनश्रेणी

## १०७२ प्राथमिक पदवीधरांची नियमबाह्य वेतनश्रेणी रद्द केल्याबद्दल परंतु बाकी गैरमार्गाने विविध पदांवर बसलेल्यांचे काय?

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** बीड जिल्हा परिषदेत आंतरजिल्हा बदलीने रुजू झालेले तसेच वस्ती शाळा शिक्षकांमधून आस्थापनेवर आलेले प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणून रुजू झालेल्या सर्व कनिष्ठ प्राथमिक शिक्षकांना दिलेली वेतनश्रेणी रद्द केली. बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष सीईओ अजित पवार यांनी १० जून २०२२ रोजी या सर्व प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी रद्द केली होती. परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी कालचा दिवस उजाडला. जिल्हा परिषदेचा सर्वात मोठा अधिकारी सीईओ असतात. जर त्यांनी दिलेल्या आदेशाची बजावणी-तामील व्हायला सुद्धा दीड-दोन महिन्याचा कालावधी लागत असेल तर यापेक्षा आणखी काय जास्तीचा मुजोरपणा हवा आहे?

या प्राथमिक शिक्षकांमध्ये अनेकांनी चक्क बनावट आवक-जावक क्रमांकाने बोगस वेतनश्रेणी तथा दर्जावाढ मिळवलेली होती. या दिल्या गेलेल्या दर्जावाढीत कमालीची अनियमितता, अयोग्यतेसह बरच काही नियमबाह्य चित्र आढळून आल्याने कुठल्याही आमिषाला बळी न पडता आणि विशेषतः राजकीय दबावाला न जुमानता सीईओ अजित पवार यांनी अखेर ही वेतनश्रेणी रद्द केली. त्यामुळे जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात सीईओ अजित पवार यांचे धन्यवाद मानले जात आहेत.

**सात वर्षांपासून शासनाची मोठ्या प्रमाणात लूट झाली असल्याने आता पगारातून हप्ते स्वरूपात गेलेली रक्कम वसूल केली जाणार**

दरवाढीमुळे मोठ्या प्रमाणात शासनाची लुट-फसवणूक झाल्याने आता गेलेल्या रकमेची पगारी मधूनच सुलभ हप्ता स्वरूपात वसुली केली जाणार असून जे सेवानिवृत्तीला आले आहेत आणि झाली आहे अशांची रक्कम मात्र सेवानिवृत्ती वेतनविषयक लाभातून करण्याचे नियोजिले असल्याची माहिती रद्दबातल दिलेल्या आदेशावरून स्पष्ट दिसून येत आहे.

**सीईओ साहेब जशी प्राथमिक पदवीधर शिक्षकांची वेतन वाढ रद्द केली तसेच एकदा अपात्र शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती : ईतर गैरमार्गाने नौकरीत असणाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करून फसवणुकीच्या नियमान्वये या दहा-पंधरा जणांना निलंबित कराच....!**

सीईओ साहेब आपण या प्राथमिक पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणी बाबतीत तत्परता दाखवली तसेच एकदा पात्र लोकांना डावलून टेबला खालून आणि राजकीय वजन वापरीत ज्या लोकांना शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून अपात्र असतानाही पदोन्नती मिळाली आहे. तर काही बोगस जातप्रमाणपत्र-जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे नौकरीत आहेत अशा या १०-१५ लोकांना आणि त्यांना पाठीशी घालत मदत करणाऱ्या कक्षाधिकारी जयलाल राजपूत, शिक्षणाधिकारी अजय बहिर आणि विशेष करून उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांना निलंबित करून फसवणुकीच्या नावाखाली या सर्वांवरती गुन्हे दाखल करून यांना एकदा जेलची हवा खाण्यासाठी पाठवाच...! पुढील वाटचालीस खूप बरं होईल. वर्षा-दीडवर्षाने आपल्या बीड जिल्ह्यामध्ये निवृत्त व्हाल. परंतु जाण्यापूर्वी आपण बीड जिल्हा परिषदेला आणि विशेषतः शिक्षण विभागाला लागलेली कीड कायमची जर का काढून गेलात तर बीड जिल्ह्याच्या इतिहासात होऊन गेलेल्या आणि येणाऱ्या अगणित अधिकाऱ्यांपैकी जे काही बोटावर मोजण्याइतपत अधिकाऱ्यांचे आवर्जून नाव घेतले जाईल त्यामध्ये तुमचेही नाव आवर्जून घेतील. बीड जिल्हावाशी आपणास कदापि विसरणार नाहीत. तेंव्हा साहेब आपण एकदा खोलात जाऊन चौकशी करून शिवाजी अंडील, सीमा टकले, ज्ञानेश्वर आगळे, सुधाकर यादव, माटे-सुळे-गर्जे, आर्सुळ आप्पा यांच्यासह अजय बहिर, रंगनाथ राऊत, गणेश गिरी, वैशाली आकुसकर, वर्षाराणी महाजन यांच्यासह विरोधात असलेल्या तक्रारींची सत्यता जाणून घ्या, पडताळणी करा. मग यांनी कशा-कशाची आणि काय-काय उजळणी केलीय ते तुमच्या लक्षात येईल आणि सीईओ साहेब जेंव्हा हे सारं तुमच्या लक्षात येईल तेंव्हा मात्र यांना ब्रम्हदेव सोडता कुणीही आपल्या कचाट्यातून वाचवू शकणार नाही हेही तितकेच खरे आहे. तेंव्हा आम्हा बीड जिल्हावाशीयांवरती जाण्याअगोदर ऐवढा कर्तव्यरुपी उपकार करून टाका अशी आर्त हाक या अशामुळे विविध स्तर, पदोन्नत्या व ईतर महत्वपूर्ण बाबींपासुन वंचित राहिलेल्या सर्वांचीच आपणास असल्याने आपण आता याकडे कसे पाहणार आणि यात नेमकी काय भूमिका घेणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे....!

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आयोजित सर्वशाखीय मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ ही "सामाजिक ऐक्य | हेच आमचे तत्व" या तत्वप्रणालीनुसार कार्यरत आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या कर्तव्य भावनेतून अनेक उपक्रम आजपर्यंत आम्ही राबवले आहेत. आणि पुढे ही हा वारसा जपनार आणि त्याच कर्तव्य भावनेतून सर्व शाखीय निःशुल्क वधू-वर सूचक केंद्र स्थापन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आयोजित सर्वशाखीय वधू - वर मेळावा दि.३ जुलै रोजी रविवारी आयोजित करण्यात आला आहे.

या मेळावा संदर्भात माहिती देताना सर्व शाखीय वधू-वर मेळाव्यास (घटस्फोटित विधवा) ही येऊ शकतात. सर्व शाखीय वधू-वर परिचय मेळाव्यात प्रथम वधू-वर, घटस्फोटीत मुलगा - मुलगी आणि विधवा सहभागी होऊ शकतात. उपरोक्त निर्देशित सर्वशाखीय मेळाव्यात सहभागी होणाऱ्या वधू-वर यांनी विहीत नमुन्यातील प्रवेश प्रत्रिका भरून देणे बंधनकारक आहे. प्रवेश प्रत्रिकेसोबत स्वतःचे छायाचित्र जोडणे आवश्यक आहे. प्रवेश पत्रीकेसोबत रु.३६०/= सेवा शुल्क जमा करावे लागतील. सेवा शुल्क रु.३६०/= मध्ये वधू-वर आणि सोबत एका पालकाची भोजन व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. वधू-वर यांच्या सोबत एका पेक्षा जास्त पालक संख्या असल्यास रु.१००/= प्रमाणे जेवण्याचे अतिरिक्त पैसे भरावे लागतील. सभागृहामध्ये शांतता, शिस्त व संयम बाळगून आदर्श आचारसंहितेचे पालन करावे.

हा मेळावा रविवार दि.३/७/२०२२ रोजी कलश मंगल कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद येथे सकाळी १० ते दुपारी ५ या दरम्यान आयोजित केला आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आयोजित सर्व शाखीय वधू-वर मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येने वधू-वरांनी सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नियोजन समितीतर्फे करण्यात येत आहे. याबाबत सुधीर नाईक (जिल्हाध्यक्ष) ९४२२२०६६८६ ९९२२५२६६८७, सुचेता पालोदकर (महिला जिल्हाध्यक्ष) ७५८८६४०७६६, नंदू अदवंत (समिती नियोजन), किरण शर्मा ९८२३४९२१ यांच्याशी संपर्क साधावा.



# नियमित लाईट बिल भरणाऱ्या अब्दुल वाहब यांचे महावितरणतर्फे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील नियमीत लाईट बिल भरणारे अब्दुल वाहब यांचे स्वागत करतांनी सह व्यवस्थापकीय संचालक मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता भुजंग खंदारे, ग्रामिण अधिक्षक अभियंता प्रविण दरोली, महावितरचे कार्यकारी अभियंता सुरेश दौड यांची प्रमुख उपस्थित होती.

विज बिल नियमित भरा अन्यथा लाईट कट होईल असे सांगत फिरणारी रिक्षा लगेच डोळ्या समोर येती पण हल्ली दोन बिले थक्कीत राहीले की लाईट कट करण्याची मोहीम महावितरण कंपनीने हाती घेतले आहे. म्हणुनच नियमित लाईट बिल भरणारे अब्दुल वाहब यांचे महावितरणच्या प्रमुख अधिकारी यांनी स्वागत केले.

यावेळी यमाजी वणे यांची उपस्थीती होती. यावेळी गोंदावले बोलताना म्हणाले की, जो ग्राहक नियमित शेतीचे बिल घराचे बिल दुकानाचे बिल नियमित भरेल अश्या ग्राहकांना येत्या काळात बक्षीस देऊन स्वागत समारंभ ही महावितरण कंपनीकडून करण्यात येईल.




# योग दिन जीवनशैली बनावी : प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या अनुषंगाने योग-प्राणायाम प्रशिक्षणा दरम्यान योग प्रशिक्षक प्रा.डॉ.जायभाये बोलत होते. प्रारंभी कै.रमेश वरपूडकर (वरिष्ठ) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शेख शकीला, सा.सोनपेठ दर्शनचे संपादक किरण स्वामी, क्रीडा विभागाचे डॉ.गोविंद वाकणकर, प्रशिक्षक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

त्यानंतर योग दिनाच्या प्रोटोकॉलप्रमाणे उपस्थिताना डॉ.जायभाये यांनी सूक्ष्म व्यायाम, ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, भद्रासन, तितली, वज्रासन, उष्ट्रासन, शशकासन, उत्तानमंडुकासन, वक्रासन, भुजंगासन, मकरासन, शलभासन, उत्तानपादासन, अर्धहलासन, पवनमुक्तासन, शवासन इत्यादी असनाबरोबरच कपालभाती, नाडीशोधन, शितली, भ्रामरी प्राणायाम, ध्यान इत्यादी योग-प्राणायामाचे कृतिशील प्रशिक्षण देऊन सर्वांकडून ह्या क्रिया व्यवस्थित करून घेतल्या आणि शेवटी शांतीपाठाने या योग दिनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.गोविंद वाकणकर यांनी तर आभार डॉ. संतोष रनखांब यांनी व्यक्त केले. याप्रसंगी रामेश्वर कदम, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.एम. बी.पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणांत उपस्थित होते.

# जनहित भ्रष्टाचार समितीच्या अध्यक्षपदी मिलिंद गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात जनहित भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांची नूकतीच बैठक घेण्यात आली असून यावेळी मराठवाडा अध्यक्षपदी मिलिंद गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

समितीचे संस्थापक अध्यक्ष बाबाखॉन पठाण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या संपर्क कार्यालयात बैठक घेण्यात आली आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समितीच्या विविध समस्या सोडविण्यासाठी चर्चा करण्यात आली असून समीतीला अधिक बळकटी देण्यासाठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

मराठवाडा अध्यक्ष म्हणून मिलिंद गायकवाड, जिल्हा अध्यक्ष सय्यद जब्बार सय्यद जाफर, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनकांबळे, महिला जिल्हाध्यक्षा परवीन पाशा शेख, भोकर तालुका अध्यक्ष प्रमोद चौदंते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्याच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.





खुलताबाद : बाजारसावंगीसह परिसरात आज शुक्रवार दि.24 जून रोजी दमदार पाऊस झाल्याने बळीराजा सुखावला आहे. शुक्रवार रोजी सकाळी 11 वाजता जोरदार पावसाला सुरुवात झाली. एक तासापेक्षा जास्त वेळ पाऊस सुरू होता. त्यानंतर पावसाचा जोर कमी झाला मात्र अधून मधून दिवसभर पाऊस सुरूच होता. जोरदार झालेल्या पावसाने शेतांमध्ये पाणी साचले होते व नदी, नाले, ओढे ओसंडून वाहत होते. नीम नदी व धांड नदीला मोठ्या प्रमाणात पूर आल्याने काहीवेळ रेल रस्त्यावरील वाहतूक थांबली होती. बाजारसावंगी येथील शुक्रवारचा आठवडी बाजार होता मात्र पावसामुळे बाजाराची दाणादाण उडाली. समाधानकारक पाऊस झाल्याने बळीराजाची चिंता मिटली आहे.

# आजपासून 1 जुलैदरम्यान राबविणार कृषी संजीवनी मोहीम : बाळराजे मुळीक

## शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मोहिमेचा प्रारंभ होणार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात 25 जून ते 1 जुलै दरम्यान कृषि संजीवनी मोहीम राबविणार असल्याची माहिती कन्नड तालुका कृषि अधिकारी बाळराजे मुळीक यांनी दिली आहे. त्यात म्हटले की स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत दि.25 जून ते 1 जुलै 2022 या कालावधीत कृषी विभागाकडून कृषि संजीवनी मोहीम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिन 1 जुलै हा कृषिदिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर मोहीम कालावधीत खरीप हंगाम 2022 यशस्वी करण्यासाठी व आधुनिक कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यातील कृषि विभागाचे अधिकारी / कर्मचारी, जिल्हा परिषद, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे यांचे शास्त्रज्ञ, कृषि मित्र हे शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करणार आहेत. कन्नड तालुक्यामध्ये कृषि संजीवनी मोहीम राबविण्याबाबतचे गावनिहाय नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार संपूर्ण कन्नड तालुक्यामध्ये हि मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमांतर्गत खालील प्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. दि. 25 जून विविध पिकांचे तंत्रज्ञान प्रसार, मूल्यसाखळी बळकटीकरण दिन, दि.26 जून पौष्टिक तृणधान्य दिन, दि. 27 जून महिला कृषि तंत्रज्ञान सक्षमीकरण दिन, दि. 28 जून खत बचत दिन, दि. 29 जून प्रगतशील शेतकरी संवाद दिन, दि. 30 जून शेती पूरक व्यवसाय तंत्रज्ञान दिन, दि. 1 जुलै कृषि दिन या कार्यक्रमाने या मोहिमेची सांगता होणार आहे.

तरी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी कृषि विभागाच्या कृषि मोहीम कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन कृषि तंत्रज्ञान अवगत करावे, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी, कन्नड बाळराजे मुळीक यांनी केले आहे.

# बॉक्सर चंचल याची राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कणकवली (सिंधुदुर्ग) येथे २५ जुन ते २८ जुन २०२२ दरम्यान महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेच्या मान्यतेने सिंधुदुर्ग जिल्हा हौशी मुष्टियुद्ध संघटनेच्या वतीने कणकवली येथील चौंडेश्वरी सांस्कृतिक भवनात आयोजित ८० वी पुरुष युवा गटाच्या राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिपसाठी धुळे येथील छत्रपती बॉक्सिंग क्लबचा खेळाडू बॉक्सर चंचल सिसवाल याची ५७-६० या वजनी गटात धुळे शहर बॉक्सिंग संघात निवड



करण्यात आली. त्याबद्दल धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मयुर बोरसे, छत्रपती बॉक्सिंग क्लबचे धीरज पाटील, बॉक्सिंग प्रशिक्षक भरत कोळी यांनी अभिनंदन केले व सिंधुदूर्ग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिपसाठी शुभेच्छा दिल्या.

# अवैध वाळु साठेबाजांवर कायदेशीर कारवाई करा : नितीन परदेशी

आधुनिक केसरी न्यूज


**अंबाजोगाई :** येथे दि.१४ जुन रोजी अहील्यानगर मांडवा रोड येथे मोठया प्रमाणात कारवाई करत डि.वाय.एस.पी. पंकज कुमावत यांच्या पथकाने व महसुल प्रशासनाने मोठ्या प्रमाणात अवैध वाळू साठा जप्त केला होता. परंतु 8 दिवस उलटुनही या प्रकरणात महसुल प्रशासनाने केवळ पंचनामे करण्याव्यतिरीक्त कोणतीही कायदेशीर कारवाई केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण दाबले जाते की काय या शंकेतुन या प्रकरणातील आरोपी वर महसुल प्रशासनाच्या वतीने दंडात्मक तथा पोलीसात फिर्याद देण्याची कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे मनसे विदयार्थी सेना तालुका अध्यक्ष नितीन परदेशी यांनी अंबाजोगाई तहसीलदार यांचेकडे केली आहे.

# जिल्हास्तरीय वरिष्ठ पुरुष/महिला बेसबॉल निवड चाचणीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा बेसबॉल संघटनेतर्फे जिल्हास्तरीय वरिष्ठ पुरुष/महिला गट बेसबॉल निवड चाचणीचे आयोजन दि.26 जुन 2022 रोजी सायंकाळी 4 वाजता शिवछत्रपती महाविद्यालय, N-3 सिडको, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व वरिष्ठ पुरुष/महिला खेळाडूंनी निवड चाचणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन औरंगाबाद जिल्हा बेसबॉल संघटनेचे अध्यक्ष निलेश राऊत, उपाध्यक्ष डॉ. फुलचंद सलामपुरे, सचिव गणेश बेटूदे, डॉ.उदय डोंगरे यांनी केले आहे.

तसेच या चाचणीमध्ये निवड झालेले पुरुष/महिला खेळाडु हे



विभागीय क्रीडा संकुल औरंगाबाद येथे दि. 2 जुलै ते 4 जुलै 2022 दरम्यान होणाऱ्या 15 व्या राज्य अजिंक्यपद बेसबॉल स्पर्धेत औरंगाबाद जिल्हा संघांचे प्रतिनिधित्व करतील. खेळाडूंनी निवडचाचणीसाठी सोबत आणावयाचे कागदपत्रे. आधार कार्ड झेरॉक्स, पासपोर्ट साईज 2 फोटो. अधिक माहितीसाठी प्रा.गणेश बेटूदे 8788650460, प्रा.संतोष आवचार 9503423791, प्रा. सागर रुपवते, प्रा.अक्षय बिरादार यांच्याशी संपर्क साधावा.

# साथीचे आजार होऊ नये यासाठी नागरिकांनी काळजी घेण्याचे मनपा आयुक्तांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जास्त ताप आल्यास रुग्णाचे अंग ओल्या कपड्याने पुसून काढावे रुग्णाला सरकारी अथवा खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून रक्ताची तपासणी करून घ्यावी डेंग्यू ताप चिकनगुनियाचे डाग स्वच्छ पाण्यात तयार होत असल्यामुळे घरातील टाक्या रांजण माठ व ईतर भांडी आठवड्यातून एक दिवस घासून स्वच्छ करावेत.

परिसरातील स्वच्छ पाण्याची डबकी नष्ट करावी डासांचा त्रास कमी करण्यासाठी संडासाच्या गॅस पाईपलाईन पातळ कापड किंवा जाळी बांधावी डासांपासून संरक्षणासाठी मच्छरदाणी, मच्छर अगरबत्ती आदी साधनांचा वापर करावा. घरातील खिडक्यांना जाळी बसवावी, परिसर स्वच्छ ठेवावा, डास प्रतिबंधक औषधांचे फवारणी करून घ्यावी, घसा दुखी, तीव्र ताप, अंगदुखी, सर्दी व खोकला इतर स्वाइन फ्लूची लक्षणे दिसून आल्यास शासकीय दवाखान्यात उपचार घ्यावेत. औषधे केवळ शासकीय दवाखान्यामध्ये मोफत उपलब्ध आहेत न झाल्यास मनपाला कळवावे. उघड्यावर शौचाला बसू नये यासारख्या विविध नियमांचे पालन नागरिकांनी करणे गरजेचे असल्यामुळे मनपा आयुक्त देविदास टेकाळे यांनी म्हटले आहे.





# धुळ्यात शिवसेनेची 'भक्ती प्रदर्शन' यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिवसेनेची जोरदार घोषणाबाजी करत व हातात भगवे झेंडे घेत आज धुळ्यात शिवसैनिकांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या समर्थनार्थ 'भक्ती प्रदर्शन' यात्रा काढली. शिवसेनेने अनेक वादळे पचवली असून अशी बंड करण्याची ही चौथी वेळ आहे. परंतु कोणाच्या जाण्याने शिवसेना संपत नाही, अशा भावना यावेळी शिवसैनिकांनी व्यक्त केल्या. शहरातील श्रीराम पेट्रोल पंपाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास अभिवादन करून या भक्तीप्रदर्शन यात्रेला सुरवात झाली. येथून महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत काढण्यात आलेल्या या भक्तीयात्रेत शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाचे नेतृत्व सहसंपर्क प्रमुख हिलाल माळी यांनी केले.
या भक्तीयात्रेबद्दल माहिती देताना हिलाल माळी म्हणाले की, आम्ही सर्व शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहोत. यानिमित्त आज शिवसैनिकांच्यावतीने भक्ती प्रदर्शन यात्रा काढली आहे. सामाजिक, राजकीय, जिवनातली ही ठाकरे घराण्यातली चौथी पिढी आहे. या चौथ्या पिढीत अनेक संघर्ष शिवसेनेने केले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना स्थापन केली. त्यांच्या विचारांवर कार्यकर्ते चालतात. त्यांच्या आशीर्वांदनाने निवडून येतात. मात्र काही लोक निवडून आल्यानंतर स्वतःला मोठे समजतात. अन्याय, अपमान होत असल्याचे सांगून बंड करतात. बंडाची ही चौथी टर्म आहे. त्यांना असे वाटते की आम्हीच शिवसेना, आमचेच खरे. परंतु शिवसेनेला बाळासाहेब ठाकरेंनी जन्म दिला आहे. शिवसेनेचे हिंदुत्व खरे आहे. कोणी शिवसेनेतून बाहेर पडून उद्धव साहेबांना त्रास देत असेल तर ते सहन केले जाणार नाही. मुख्यमंत्री म्हणून काम करताना उद्धव ठाकरे यांचे डब्ल्युएचओने कौतुक केले. नेत्यांमुळे शिवसैनिक नाहीत, तर शिवसेनेमुळे नेते आहेत. ठकरे घराण्याचे नाव हे असेच चालू राहील. त्यांची समाजसेवा कोणीच थांबवू शकत नाही, असेही माळी यावेळी म्हणाले.
याभक्ती प्रदर्शन यात्रेत हिलाल माळी यांच्यासह पंकज गोरे, प्रफुल पारील, नरेंद्र अहिरे, संदीप चव्हाण, भटू गवळी, संदीप सूर्यवंशी, मच्छिंद्र निकम, विलास बौधरी, ज्योत्स्ना पाटील, राजेश पटवारी, सचिन बडगुजर, घुडामण मोरे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पंचवीस हजाराची मागणी करणारा नायब तहसीलदार एसीबीच्या जाळ्यात


आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शेतजमीन प्रकरणातील चौकशी अहवाल धुळे जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यासाठी 25 हजारांची लाच मागणी केल्याप्रकरणी पिंपळनेर, ता.साक्री येथील नायब तहसीलदारांच्या अंगलट आली असून त्यांच्यासह खाजगी पंटराला धुळे एसीबीच्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. विनायक सखाराम थवील असे नायब तहसीलदारांचे तर संदीप मुसळे असे खाजगी पंटराचे नाव आहे. या कारवाईने लाचखोरांचे धाबे दणाणले आहे.
25 हजारांची लाच मागणी भोवली तक्रारदार हे पिंपळनेरचे रहिवासी आहेत. त्यांनी मौजे ठोलीपाडा येथे नवीन अविभाज्य शर्तीच्या शेत जमिनीचा खरेदीचा व्यवहार रजिस्टर सौदा पावतीने केला आहे. या शेतजमिनीवर भोगवटादार वर्ग -1 होण्यासाठी शेतजमीन मालकाने 23 सप्टेंबर 2021 रोजी नायब तहसीलदार विनायक थवील यांच्याकडे अर्ज केला होता व थवील यांनी 4 मे 2022 रोजी या प्रकरणात 7/12 उतारे व नोंदी सादर केल्या नसल्याचे कारण दर्शवत हे प्रकरण तूर्तास निकाली काढले मात्र तक्रारदार यांनी या प्रकरणातील कागदपत्राची पूर्तता करून वेळोवेळी नायब तहसीलदार विनायक थवील यांची भेट घेतली. या प्रकरणांचा चौकशी अहवाल धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे थवील यांनी 25 हजारांची मागणी केली होत व तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार नोंदवल्यानंतर ट्रॅप लावण्यात आला मात्र थवील यांना संशय आल्याने त्यांनी बुधवार, 8 जून 2022 लाच स्वीकारली नाही मात्र एसीबीला लाच मागणी अहवाल प्राप्त होताच त्यांनी खाजगी पंटरासह नायब तहसीलदारांना अटक केली. ही कारवाई धुळे विभागाचे पोलीस उपअधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रकाश झोडगे, निरीक्षक मंजीतसिंग चव्हाण, राजन कदम, शरद काटके, कैलास जोहरे, भुषण खलाणेकर, गायत्री पाटील, भुषण शेटे, संदीप कदम, संतोष पावरा, सुधीर मोरे व जगदीश बडगुजर यांच्या पथकाने केली.

# "पेरते व्हा पेरते व्हा" म्हणत पावशा पक्ष्याने दिले शेतकऱ्यांना पावसाचे संकेत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात पावसाळ्यात सुरुवातीलाच गावात, जंगले, शेते तुडवीत असताना एक पक्षी दिवसभर ओरडताना आढळतो "पेरते व्हा, पेरते व्हा" शेतकरी बळीराजाही जणू काही त्या पक्ष्याच्या सांगण्यावरून शेतीच्या कामांना सुरुवात करतो. कोकिळेच्या जातकुळातील कुकू पक्षी हा पावसाळ्यात स्थलांतर करून आपल्या भागात येतो.
सध्या पेरते पेरते व्हा अशी पावशा पक्ष्याची शीळ रानावनात व शेतात पक्षी सध्या औसा शहर व ग्रामीण भागासह परिसरातील वादी असून नांगरणी, धुरे पेटविण्याच्या कामांना वेग आला आहे. पावसाच्या सुरुवातीला शेतकरयांना पेरते व्हा, असा संदेश पावशा पक्षी देतो. सध्या शेती शिवारात या पक्षाची साद घुमत आहे. त्यामुळे लवकरच पाऊस कोसळेल अशी अश्या शेतकऱ्यांना आहे. शेतशिवारात सध्या खरीप पूर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे. शेतकरी नांगरणी करीत आहेत. काही शेतात परहे टाकण्याचे काम करीत आहेत. तर काही शेतकरी पेरणी करत आहे. धुरे पेटवून दिले जात आहेत.
शेती विषयक कामांची लगबग सुरू आहे. पाऊस वेळेवर आला तर आपली पंचाईत नको म्हणून प्रत्येक शेतकरी मशागत करण्यात व्यस्त झाला आहे. पावसाचा या राखडी रंगाचा या पक्षावर सोनेरी रंगछटेचे पट्टे असतात. या राखाडी रंगाच्या या पक्ष्यावर विविध भागांत दिसत आहे. शेतशिवारात आता काम सोनेरी रंगछटेचे पट्टे असतात. हा पक्षी स्थानिक स्थलांतर करणारा असून, कोकिळेच्या वर्तनाचा आहे. कोकीळ कामांना वेग आला आहे.



पावसाळ्याच्या सुरुवातीला जसे स्वतःच्या पिलांसाठी घरटे करीत नाही तसे या पक्ष्याचे आहे. मादी पक्षी सातभाई (खिवा) पक्ष्यांच्या सध्या शेतशिवारात या पक्ष्याची साद घुमत आहे. त्या घरात आपली अंडी घालतो. असा हा पक्षी आता सोयगाव तालुक्यातील विविध भागांत शेतकऱ्यांना पेरणीसाठी प्रवृत्त करीत आहे. पावशा पक्ष्याचे इंग्रजी नाव इंडियन प्लॅनटिव्ह कुकू असून, तो फारसा आकर्षक नाही. मात्र, स्याच्या आवाजात गोडवा आहे. अळ्या, कीटक, फळे हा त्याचा आहार आहे.



# आदिवासी बांधवांचे मंजूर झालेले व्ययक्तिक वनदाव्यातील 7/12 तात्काळ वाटप करा

आधुनिक केसरी न्यूज

**हिमायतनगर :** तालुक्यातील दुधड-वाळकेवाडी, पोटा, वडाचीवाडी, वाईवाडी येथील आदिवासी व्यक्तीचे जे वनदावे महसूल विभागाने पडताळणी करून मंजूर केले व त्यांच्या बैठकीत निकाली काढले अशा व्यक्तीचे 7/12 व मालकी हक्क प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करावे यासाठी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना दुधड-वाळकेवाडीचे उपसरपंच संजय माझळकरसह पंचकोशीतील आदिवासी बांधवांनी निवेदन दिले. या भागातील बऱ्याशा आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह हे त्यांच्या डोंगरपायथ्याशी वसलेल्या जमिनीवर अवलंबून आहे. पूर्णतः हे जमीन उतारवटी व दगडी असल्यामुळे सदर जमिनीमध्ये जंगली रानभाजी कर्टुले, सीताफळ, ज्वारी मुख्यता हे पीक घेतले जाते त्यातच आपला आनंद मानून जीवन जगतो. अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वनहक्क मान्यता अधिनियम 2006 व नियम 2008 सह सुधारीत नियम 2012 अंतर्गत वैयक्तिक वनहक्क नियमानुसार मंजूर व्हावे. कारण मागील पिठीपासून हलअपेष्ठा सहन करत जंगल जमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी वननिवासी दावेदारास विना विलंब वनहक्क प्राप्त करून त्यांचे आर्थिक जीवनमान उचवण्यासाठी व पारंपरिक रित्या वनावर किंवा वनजमिनीवर खऱ्याखुऱ्या गरजूना उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या आदिवासी व इतर पारंपरिक वननिवासी समूहावरील ऐतिहासिक अन्याय दूर करावा व कायदेशीर मान्य कारण्याबरोबरच त्यांच्यात जंगलातील जैवाविविधता सहरक्षना संबंधित कर्तव्यची जाणीव निर्माण करावी अशी वनहक्क कायद्यात तरतूद आहे. याचे तंतोतंत पालन करून त्यांना 7/12 व मालकी हक्क प्रमाणपत्र वाटप करण्यात यावे.



# मस्तिष्क आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत निदान व उपचार शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हयातील 0 ते 18 वयोगटातील मस्तिष्क आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत निदान व उपचार शिबीराचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) धुळे येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष तुषार रंधे यांच्या हस्ते झाले आहे.
मुंबईच्या प्रसिध्द पिडीयाट्रिक न्युरोलॉजिस्ट डॉ. अनेता हेगडे व जसलोक आणि वाडीया हॉस्पिटल, मुंबई व त्यांची 29 तज्ज्ञ डॉक्टरांची टीम यांनी प्रामुख्याने मस्तिष्क आजार असलेले मतिमंद, ऑटीनम मेंदूचा पक्षघात (फोटस), नसांचा आजार मुव्हमेंट डिसऑर्डर अशा जिल्हयातील व शहरी भागातील पहिल्या दिवशी एकूण 267 विद्यार्थ्यांची मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबिराचे आयोजन समग्र शिक्षा जिल्हा परिषद धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) धुळे तसेच जय वकील फाऊंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधा तसेच थेरपी देण्यात आली आहे तसेच लाभार्थ्यांना गरजेनुरूप सहा महिन्यापर्यंतची मोफत औषधे वाटप व समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# टिटवी-पळसखेडा येथे विज पडून बैल जागीच ठार, शेतकरी जखमी

## शेतकऱ्याचे पन्नास हजाराचे रुपयांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी-पळसखेडा, पळसखेडा येथील आज दुपारी २४/६/२२ रोजी दोन वाजेच्या सुमारास विजांच्या कडकडाटात, वादळीवाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली होती. वादळीवाऱ्यासह, पावसाला सुरुवात होताच शेतकरी शेतातील आऊत फाटा व इतर सामानाची जमवाजमव करुन घराकडे निघण्याच्या तयारीत असतानाच टिटवी येथील ललीताबाई सुदाम चव्हाण या शेतातील झाडाखाली उभ्या होत्या. झाडावर अचानकपणे विज कोसळून झाडाखाली बांधलेला बैल जागीच ठार तर काही शेतकरी झाडाखाली पावसामुळे उभे होते त्यामध्ये पळसखेडा येथील शेतकरी गट नंबर ३८ पळसखेडा शिवारामधे शेतात होते. अचानक विज कोसळाने शाहरुख सरवर तडवी हे जखमी झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की सोयगाव तालुक्यातील पळसखेडा शिवारात गट नंबर ३८ शेतात शाहरुख सरवर तडवी जखमी झाले आहे त्यांना पुढील उपचारासाठी बुलढाणा येथे शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे शेतकरी ललीताबाई सुदाम चव्हाण यांच्या मिलकीची शेतजमीन आहे. या शेतातील झाडाखाली त्यांनी नियममितप्रमाणे बैलाची जोडी बांधलेली असायाची दुपारी अचानक दोन वाजेच्या सुमारास विजांच्या कडकडाटात, वादळीवाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली होती. म्हणून शाहरुख तडवी व ललीताबाई सुदाम चव्हाण शेतातील इतर सामानाची आवराआवर करुन बैलाची जोडी घरी घेऊन जाण्यासाठी गावाकडे निघाले असतानाच अचानकपणे जोराने विजेचा कडकडाट झाला व शाहरुख तडवी यांच्या डोळ्यासमोर प्रखर लखलखाट झाला व काही कळण्याच्या आतच ते विजेने शाहरुख तडवी जखमी झाले आहे तर बैल जागीच ठार झाले.

या आकस्मिक घटनेमुळे व शाहरुख तडवी हे जबरदस्त जखमी झाले आहे तर ललीताबाई सुदाम चव्हाण याचां बैल ठार झाल्याचे आजूबाजूला असलेल्या शेतकऱ्यांनी पाहिले अत्यंत गरिबीची परिस्थिती व त्यातच विज पडून बैल ठार झाल्यामुळे त्यांचे जवळपास पन्नास हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. म्हणून या नैसर्गिक आपत्तीत ठार झालेल्या गुरांची नुकसान भरपाई मिळावी अशी अपेक्षा टिटवी-पळसखेडा ग्रामस्थांनी केली आहे.

**काळ आला होता पण वेळ आली नव्हती**

शाहरुख तडवी हे जखमी झाले आहे परंतु नशिब बलवत्तर म्हणून ते बालबाल बचावले म्हणून काळ आला होता पण वेळ आली नव्हती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.



# डायटतर्फे जिल्हाभरातील विद्यार्थ्यांचे सेतू अभ्यास सर्वेक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तथा डायट या संस्थेतील अधिव्याख्याता यांच्यातर्फे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे सेतू अभ्यास सर्वेक्षण करण्यात येत आहे. जळगाव तालुक्यातील कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचे डायटतर्फे सर्वेक्षण करण्यात आले.

सर्वेक्षणात डायट प्राचार्य डॉ. अनिल झोपे, अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे, अधिव्याख्याता डॉ. अरूण भांगरे यांनी विद्यार्थ्यांकडून पुनर्रचित सेतू अभ्यास सर्वेक्षण ऑनलाईन पद्धतीने लिंक भरून करून घेतले. यावेळी लिंकमधील विविध प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी भरून दिली. प्रसंगी शाळेतील शिक्षक सुनंदा रोझतकर, सविता निंभोरे, विनोद जयकर, गणेश तांबे, डॉ. जगदीश पाटील आदी शिक्षकांची उपस्थिती होती. सेतू अभ्यास सर्वेक्षणात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत पुनर्रचित सेतू अभ्यासामध्ये समाविष्ट अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न निर्धारित करण्यात आले आहेत. त्यात इयत्तानिहाय एकच प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली असून त्यामध्ये संबंधित इयत्तेतील हिंदी विषय सोडून सर्व विषयांवरील प्रश्नांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक विषयासाठी दहा प्रश्न विचारण्यात आले आहेत.

**अध्ययन क्षय भरून काढण्यासाठी सर्वेक्षण**

राज्यातील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय भरून काढण्यासाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी पुनर्रचित सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे. त्याची शालेय स्तरावर अंमलबजावणी होणार असून त्यापूर्वी विद्यार्थ्यांची शालेय स्तरावर इयत्ता व विषयनिहाय पूर्व चाचणी घेण्याची सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सेतू अभ्यासाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर इयत्ता दुसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे नमुना आधारित सर्वेक्षण घेण्यात येत आहे.

या सर्वेक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून त्याचे निष्कर्ष प्रसिद्ध केले जाणार आहेत. हे सर्वेक्षण डायटचे अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समावेशीत शिक्षणतज्ञ व विशेष शिक्षक यांच्या सहकार्याने घेतले जात आहे. त्यानुसार जळगाव तालुक्यातील कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत डायट प्राचार्य डॉ. अनिल झोपे, अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंके, अधिव्याख्याता डॉ. अरूण भांगरे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे सेतू अभ्यास सर्वेक्षण करून घेतले.

**अध्ययनात नाविन्यपूर्णता आणावी : डॉ. अनिल झोपे**

गेल्या दोन वर्षांपासून कमी-अधिक प्रमाणात शाळा उघडल्याने विद्यार्थ्यांचे बरेसचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. हे नुकसान भरून काढण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात नाविण्यपूर्णता आणल्यास त्यांना शाळेची गोडी लागून शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागेल, असेही डायट प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी शिक्षकांशी संवाद साधतांना सांगितले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी देखील संवाद साधला. तसेच शाळेचा भौतिक परिसर, बाला उपक्रमांतर्गत शाळेची केलेली वैविध्यपूर्ण सजावट, अध्ययन-अध्यापनासाठी पोषक वातावरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि गुणवत्ता पाहून त्यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले. अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे व अधिव्याख्याता डॉ. अरूण भांगरे यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# महावितरणच्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना अडॅप्टिव्ह स्कूटर

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** महावितरणच्या चार दिव्यांग कर्मचाऱ्यांना औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते अडॅप्टिव्ह स्कूटरचे वितरण करण्यात आले.

दिव्यांग कर्मचाऱ्यांना दळणवळण करणे सोयीचे व्हावे यासाठी महावितरणतर्फे अडॅप्टिव्ह स्कूटर (सहायक यंत्र साधन) देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार शहर-२ विभागात कार्यरत कर्मचारी डॉ.संतोष कानडे, डॉ.बंडू राठोड, विजय पवार व सिद्धार्थ बनकर या चार कर्मचाऱ्यांना डॉ.गोंदावले यांच्या अडॅप्टिव्ह स्कूटरच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता भुजंग खंदारे, औरंगाबाद शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, कार्यकारी अभियंता महेश पाटील, उपव्यवस्थापक संजय खाडे, सुनील पाठक आदी उपस्थित होते. कंपनीने उपलब्ध करून दिलेल्या सुविधेबद्दल चारही कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY



MAHAVIR
GHAR SANSAR

- Wholesale & Retail
- Kirana, Dry Fruits, Spices
- Crockery, Home Appliances
- Home Cleaning Material, Steel & Aluminium
- Plastic Items & Many More

Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad